cmyk

## संपादकीय

### ...तर संसदेवर विश्वास कमी होईल !

लोकसभेत घडलेली घटना भारतीय संसदीय लोकशाहीच्या वर्तमान स्थितीचे स्पष्ट दर्शन घडवते. विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील आभार प्रस्तावावर बोलताना 'द कारव्हान' मासिकातील एका लेखाचा आधार घेऊन माजी लष्करप्रमुख जनरल मनोज मुकुंद नरवणे यांच्या अप्रकाशित आत्मचरित्र 'फोर स्टार्स ऑफ डेस्टिनी' मधील उतारे वाचण्याचा प्रयत्न केला.


दैनिक

www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र वर्ष–५ अंक–२७७ बुधवार दि.४ फेब्रुवारी २०२६ RNI No.: MAHMAR/2021/85884 NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 पाने–६ किंमत ३ रूपये


## थोडक्यात...

### तर पाकिस्तानची एक पिढी संपून जाईल – कपिल देव

मुंबई: २० वर्ल्डकप २०२६ अवघ्या काही दिवसांवर आला असताना पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने नवीन नाटक सुरू केले आहे. त्यांनी १५ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या भारत–पाकिस्तान सामन्यावर बहिष्कार घालण्याची भाषा केली असून आयसीसीने त्यांना फटकारले आहे. पाकिस्तानच्या या निर्णयानंतर क्रिकेट वर्तुळातून तीव्र प्रतिक्रिया येत आहेत. आता भारताचे माजी कर्णधार कपिल देव यांनी देखील या संपूर्ण प्रकरणावर प्रतिक्रिया दिली आहे. त्यांनी पाकिस्तानचा हा निर्णय भारतापेक्षा पाकिस्तानलाच जास्त नुकसानदायक आहे. त्यांना भविष्यात याची मोठी किंमत मोजावी लागू शकते, असे म्हटले आहे. कपिल देव म्हणाले, जर हा निर्णय क्रिकेट बोर्डाच्या सांगण्यावरून घेतला गेला आहे. जर क्रिकेट बोर्ड खेळाडुंना खेळू नका असे सांगत असेल तर या देशाची प्रतिमा मलीन झाली आहे. असे झाले तर पाकिस्तान क्रिकेट एकाकी पडेल. तुम्ही संपूर्ण एका पिढीला संपवून टाकत आहात, कपील म्हणाले.

### बिहारमधील शेतकऱ्यांना वर्षाला ९ हजार मिळणार

पाटणा : बिहारमधील नितीश कुमार यांच्या सरकारने शेतकऱ्यांना मोठा दिलासा दिला आहे. राज्य सरकारने २०२६ च्या अर्थसंकल्पातून जननायक कर्पूरी ठाकूर किसान सन्मान निधी योजनेची घोषणा केली. याअंतर्गत शेतकऱ्यांना वार्षिक ३ हजार रुपये अतिरिक्त मिळतील. यामुळे केंद्राकडून मिळत असलेले ६ हजार रुपये मिळून शेतकऱ्यांच्या बँक खात्यात एकूण वर्षाला ९ हजार रुपये जमा होतील. विधानसभा निवडणुकीपूर्वी जेडीयू–भाजप यांच्या युतीने याबाबत आश्वासन दिले होते. त्याची आता अर्थसंकल्पातून घोषणा करण्यात आली आहे. यामुळे बिहारमधील ७३ लाख शेतकऱ्यांना आता वार्षिक ६ हजार रुपयांऐवजी ९ हजार रुपये मिळतील.

### राजपाल यादवला आज शरण येण्याचे आदेश

नवी दिल्ली: चेक बाऊन्स प्रकरणात दिल्लीउच्च न्यायालयाने बॉलिवूड अभिनेता राजपाल यादवविरोधात कडक भूमिका घेतली आहे. न्यायालयाने नाराजी व्यक्त करत, राजपाल यादवला ४ फेब्रुवारी २०२६ रोजी सायंकाळी ४ वाजेपर्यंत संबंधित तुरुंग अधीक्षकांसमोर सरेंडर करण्याचे आदेश दिले आहेत. न्यायालयाने स्पष्ट केले की, वारंवार दिलेल्या संधी आणि आश्वासनांनंतरही राजपाल यादवने ठरलेली रक्कम अदा केलेली नाही. हे न्यायिक प्रक्रियेबद्दलची बेपर्वाई दर्शवते. झालेल्या सुनावणीत न्यायमूर्ती स्वर्ण कांता शर्मा यांनी राजपाल यादव यांच्या वर्तनावर तीव्र नाराजी व्यक्त केली.

### काँग्रेसचे सात खासदार निलंबित

दिल्ली: अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी भारत–चीन सीमावादावरून लोकसभेत गोंधळ पाहायला मिळाला. माजी लष्करप्रमुख नरवणे यांच्या अप्रकाशित पुस्तकाचा संदर्भ देत राहुल गांधींनी उपस्थित केलेल्या मुद्द्यांमुळे सत्ताधारी आणि विरोधक आमनेसामने आले. यादरम्यान कागद भिरकावण्यात झाल्याने पीठासन सभापतींनी काँग्रेसच्या सात आणि माकपच्या एका खासदाराला संपूर्ण अधिवेशनासाठी निलंबित केले. निलंबित सदस्यांमध्ये मणिकम टागोर, अमरिंदर सिंह राजा वारिंग, किरण कुमार रेड्डी, हिबी ईडन, डीन कुरियाकोस, प्रशांत पडोले , एस वेंकटेशन यांचा समावेश आहे.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,

बीड, दि.३ फेब्रुवारी २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ५९.०० क्विंटल | २,१०० | ३,२७० | २,५५७ |
| ज्वारी/हायब्रिड : ७८.०० क्विंटल | २,३०० | ४,४५० | ३,३३२ |
| मका/लोकल: ३.५० क्विंटल | १,५०० | १,५०० | १,५०० |
| तूर : १२६.०० क्विंटल | २,५१० | ८,२२१ | ७,४८६ |
| उडीद : १.०० क्विंटल | ५,५०० | ५,५०० | ५,५०० |
| बाजरी: २७.५० क्विंटल | २,४०० | ३,१३४ | २,८०८ |
| मुग:०.५० क्विंटल | ६,००१ | ६,००१ | ६,००१ |
| सोयाबीन: २३.०० क्विंटल | ५,१०० | ५,५२० | ५,३०६ |
| हरभरा: २.०० क्विंटल | ४,१०० | ५,५०१ | ४,९०० |

# पंतप्रधानांनी शेतकऱ्यांच्या श्रम अन् घामाचा सौदा केला !

## अमेरिका–भारत व्यापारी करारावर सही केल्याने राहुल गांधी यांचा आरोप

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

**काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी मंगळवारी (३ फेब्रुवारी २०२६) भारत–अमेरिका व्यापार करारावरून सरकारवर जोरदार टीका केली, आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी तडजोडीच्या स्थितीत आले असल्याचा दावा केला. विरोधी पक्षांच्या गदारोळामुळे लोकसभा अनेकदा तहकूब झाल्यानंतर संसद परिसरात पत्रकारांशी बोलताना राहुल गांधी यांनी आरोप केला की, पंतप्रधानांनी या कराराद्वारे भारतीय शेतकऱ्यांच्या मेहनतीचा सौदा केला आहे.**



राहुल गांधी पुढे बोलताना म्हणाले की, जो व्यापार करार चार महिन्यांपासून रखडला होता. त्यात काहीही बदल झालेला नाही, पण ज्या कारणास्तव मोदी आणि मला दोघांनाही माहिती आहे, त्या कारणास्तव त्यांनी या करारावर स्वाक्षरी केली, असे सांगत, नरेंद्र मोदीजींवर प्रचंड दबाव आहे. हजारो कोटी रुपये खर्च करून तयार केलेल्या त्यांच्या प्रतिमेचा 'फुगा' फुटू शकतो, असा इशाराही यावेळी त्यांनी दिला. लोकसभेत विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी आरोप केला की, पंतप्रधान त्यांना 'नरावणे, एपस्टाईन फाइल्स आणि त्यांनी शुल्काच्या (टॅरिफ) बाबतीत कसे शरणागती पत्करली' याबद्दल बोलू देण्यास 'खूप घाबरत' आहेत. इतिहासात पहिल्यांदाच राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील आभार प्रस्तावादरम्यान विरोधी पक्षनेत्यांना बोलण्याची परवानगी दिली गेली नाही. पुढे बोलताना राहुल गांधी म्हणाले की, भारताच्या शेतकऱ्यांनी हे समजून घेतले पाहिजे की, या व्यापार करारामध्ये नरेंद्र मोदींनी तुमच्या श्रमाचा आणि घामाचा सौदा केला आहे. आणि याचे कारण ते आता तडजोडीच्या स्थितीत आहेत. केवळ शेतकऱ्यांचाच नाही, तर संपूर्ण देशाचा सौदा झाला आहे. म्हणूनच सभागृहात मला बोलू दिले जात नाही,

▶▶ पान २ वर

## पंकजा मुंडेंच्या हेलिकॉप्टरमध्ये तांत्रिक बिघाड

### वैमानिकाच्या सतर्कतेमुळे मोठा अनर्थ टळला



छ.संभाजीनगर । प्रतिनिधी

**राज्याच्या पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांच्या हेलिकॉप्टरमध्ये मंगळवारी सकाळी उड्डाणापूर्वीच तांत्रिक बिघाड झाल्याची घटना घडली.**

जिल्हा परिषद निवडणुकीच्या प्रचारासाठी त्या छत्रपती संभाजीनगरहून लातूरकडे

▶▶ पान २ वर

## पुणे आणि बीडच्या पालकमंत्रीपदी सुनेत्रा पवारच

मुंबई । प्रतिनिधी

**राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे बारामती येथे विमान अपघातात दुर्दैवी निधन झाले. त्यानंतर प्रशासकीय कामात खंड पडू नये यासाठी राज्य सरकारने मंत्रिमंडळात मोठे बदल केले आहेत. अजित पवार यांच्या निधनानंतर रिक्त झालेल्या उपमुख्यमंत्री पदावर सुनेत्रा पवार यांची वर्णी लागली आहे. तर त्यांच्याकडे आता पुणे आणि बीड या दोन्ही जिल्ह्यांचे पालकमंत्रीपद सोपवण्यात आले आहे.**



पुणे जिल्हा हा अजित पवारांचा बालेकिल्ला मानला जात होता. या जिल्ह्याचा विकास आणि प्रशासनावर त्यांची पकड होती. तोच वारसा पुढे नेण्यासाठी सुनेत्रा पवार यांची पुणे जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदी नियुक्ती करण्यात आली आहे. बीड जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदावरून महायुतीत अनेक चर्चा सुरू होत्या. मात्र, अजित पवारांनी सुरू केलेले प्रकल्प पूर्ण करण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसच्या आमदारांनी सुनेत्रा पवार यांच्याच नावाचा आग्रह धरला होता, ज्याला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मान्यता दिली. अजित पवारांच्या अपघाती निधनानंतर राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये (अजित पवार गट) नेतृत्वाचा प्रश्न निर्माण झाला होता. मात्र, पक्षाने एकमताने सुनेत्रा पवार यांची विधिमंडळ पक्षनेतेपदी निवड केली. त्यानंतर राज्य सरकारने त्यांच्याकडे उपमुख्यमंत्री पदासह अजित पवारांकडे असलेली महत्त्वाची खाती आणि जिल्ह्यांचे पालकत्व देण्याचा निर्णय घेतला आहे. पुणे आणि

▶▶ पान २ वर

# रोहित पवारांना कोर्टाने फटकारले

## बॅटही पकडता न येणाऱ्यांना कशाला घेता?



नवी दिल्ली । वृत्तसंस्था

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या निवडणुकांवरील स्थगिती उठवण्यास सुप्रीम कोर्टाने मंगळवारी स्पष्ट नकार दिला. मुंबई उच्च न्यायालयाने दिलेली स्थगिती कायम ठेवत, सुप्रीम कोर्टाने एमसीएच्या कारभारावर अत्यंत कडक ताशेरे ओढले. उच्च न्यायालयाने तुम्हाला मोठा गैरव्यवहार करण्यापासून रोखले आहे, अशा शब्दांत न्यायालयाने एमसीएला आणि एमसीएचे विद्यमान अध्यक्ष रोहित पवार यांना फटकारले आहे.

सरन्यायाधीश सूर्यकांत, न्यायमूर्ती जोयमाल्य बागची आणि न्यायमूर्ती विपुल एम. पांचोली यांच्या खंडपीठासमोर ही सुनावणी झाली. एमसीएने या निवडणुकीवरील स्थगिती हटवण्याची मागणी केली होती. मात्र, न्यायालयाने ती फेटाळून लावली. मुंबई उच्च न्यायालयाचा निर्णय योग्यच आहे. त्यांनी तुम्हाला मोठा फ्रॉड करण्यापासून रोखले आहे. आम्हाला अजून बोलायला लावू नका अशा शब्दात सुप्रीम कोर्टाने फटकारले. हे प्रकरण सध्या उच्च न्यायालयात प्रलंबित असून तिथेच आपली बाजू मांडावी, असेही सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले. सुप्रीम कोर्टाने हस्तक्षेप करण्यास नकार दिल्यामुळे आता एमसीएला मुंबई उच्च न्यायालयातच आपली बाजू सिद्ध करावी लागणार आहे. उच्च न्यायालयाने आधीच सांगितले आहे की, ४०० नवीन सदस्य अचानक वाढवणे ही बाब पारदर्शकता आणि निष्पक्षतेवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण करते. यामुळे एमसीएच्या आगामी निवडणुका आता कायदेशीर कचाट्यात अडकल्या आहेत.

▶▶ पान २ वर

## बीड जिल्ह्यात वर्षभरात २५६ शेतकरी आत्महत्या

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात गेल्या एक वर्षाच्या कालावधीत (१ जानेवारी २०२५ ते ३१ डिसेंबर २०२५) तब्बल २५६ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची धक्कादायक आणि विदारक माहिती समोर आली आहे. जिल्हा प्रशासनाकडे या सर्व आत्महत्यांची अधिकृत नोंद असून ही आकडेवारी मराठवाड्यातील शेतकऱ्यांची भयावह अवस्था अधोरेखित करणारी ठरत आहे.

शेतीतील सततची नापिकी, वाढते उत्पादन खर्च, खाजगी सावकार व बँकांचे कर्ज, बाजारभावातील अस्थिरता, तसेच अवकाळी व अतिवृष्टीमुळे झालेले प्रचंड नुकसान यामुळे बळीराजा आर्थिक कोंडीत सापडत असून अनेकांना आत्महत्येसारखा टोकाचा निर्णय घ्यावा लागत असल्याचे वास्तव पुन्हा एकदा समोर आले आहे. १९३ प्रकरणे पात्र, मात्र सर्वांनाच मदत नाही जिल्हा प्रशासनाने आत्महत्येची प्रकरणे

▶▶ पान २ वर

## वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर आता कठोर कारवाई!

### पाच वेळा नियम मोडल्यास वाहनाची नोंदणी रद्द तर चालकाचा परवानाही बाद

पुणे । प्रतिनिधी

केंद्र सरकारने केंद्रीय मोटार वाहन कायदा, १९८९ मध्ये दुरुस्ती केल्याने वाहतूक नियमांचे वारंवार उल्लंघन करणाऱ्यांवर आता कठोर कारवाई केली जाणार आहे. नवीन तरतुदीनुसार एका वर्षात पाच वेळा वाहतूक नियमांचे उल्लंघन केल्यास संबंधित वाहनाची नोंदणी तसेच



चालकाचा वाहनचालक परवाना कायमस्वरूपी रद्द केला जाईल. वाढते रस्ते अपघात आणि बेशिस्त वाहनचालकांमुळे जाणारे निष्पाप जीव वाचवण्यासाठी हे पाऊल उचलण्यात आले आहे. नवीन नियमानुसार वाहतूक नियमांचे उल्लंघन

▶▶ पान २ वर

## न्यायालयीन कर्मचाऱ्यांना निवडणूक कर्तव्य लावण्यावर वाद

### राज्य निवडणूक आयोगाचा घटनात्मक अधिकारांचा दावा

मुंबई । प्रतिनिधी

राज्य निवडणूक आयोग ही घटनात्मक संस्था असून राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक पारदर्शक आणि मुक्त वातावरणात घेण्याची जबाबदारी या आयोगाची आहे. या संस्थांच्या निवडणुकांना लोकप्रतिनिधी कायदा १९५१ लागू होत नाही. त्यामुळे आयोगाने आपल्या घटनात्मक अधिकारांचा वापर करून विविध सरकारी विभाग आणि प्राधिकरणांकडून निवडणुकीच्या कामासाठी कर्मचाऱ्यांची मागणी केली असा दावा राज्य निवडणूक आयोगाने केला आहे. तसे प्रतिज्ञापत्र उच्च न्यायालयात सादर केले. खंडपीठाने याचिकेची सुनावणी दोन आठवडे तहकूब ठेवली.

मुंबई महापालिकेच्या १५ जानेवारी रोजी झालेल्या निवडणुकीत कनिष्ठ न्यायालयांतील कर्मचाऱ्यांना निवडणूक काम करण्याचे पत्र जिल्हा निवडणूक अधिकारी म्हणून काम करणाऱ्या महापालिका आयुक्तांनी २२ डिसेंबर रोजी पाठविले होते. त्या पत्राची दखल घेत, मुख्य महानगर दंडाधिकाऱ्यांनी महापालिका आयुक्त आणि मुंबई शहर जिल्हाधिकाऱ्यांना पत्र पाठवून कनिष्ठ न्यायालयांतील कर्मचाऱ्यांना निवडणूक कामातून वगळण्याचा प्रशासकीय निर्णय उच्च न्यायालयाने घेतल्याचे कळविले. तसेच न्यायालयाच्या

▶▶ पान २ वर

# व्हॉट्सअप- मेटा भारतातून हद्दपारा होणार !

## संविधानाचे पालन करा नाहीतर देश सोडा; सर्वोच्च न्यायालयाचा इशारा




दिल्ली । वृत्तसंस्था

**भारतातील नागरिकांच्या डेटा गोपनीयतेबाबत सर्वोच्च न्यायालयाने अत्यंत कडक भूमिका घेत व्हॉट्सअप आणि त्याची मूळ कंपनी मेटाला इशारा दिला आहे. संविधानाचे पालन करणार नसाल, तर भारतात व्यवसाय करता येणार नाही, अशा शब्दांत न्यायालयाने कंपन्यांना फटकारले आहे. युजरचा डेटा कोणत्याही परिस्थितीत शेअर केला जाणार नाही, याबाबत लेखी हमी देणारे प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत.**

मुख्य न्यायाधीश सूर्यकांत यांनी सुनावणीदरम्यान सांगितले की, युजरचा गोपनीयता हा मूलभूत अधिकार आहे आणि त्यावर कोणतीही तडजोड केली जाणार नाही. जर व्हॉट्सअॅप आणि मेटाने लेखी हमी दिली नाही,

▶▶ पान २ वर

### युजरचा डेटा शेअर करणार नसल्याचे प्रतिज्ञापत्र सादर करा

सुनावणीदरम्यान मुख्य न्यायाधीशांनी व्हॉट्सअॅप आणि मेटाला आदेश दिले की, ''आम्ही युजरचा डेटा शेअर करणार नाही,'' असे नमूद असलेले प्रतिज्ञापत्र सादर करावे. जर कंपन्यांनी याबाबत स्पष्ट भूमिका घेतली नाही, तर त्यांची याचिका बाद केली जाईल, असे न्यायालयाने सांगितले. न्यायालयाचा रोख पाहता, डेटा संरक्षण आणि डिजिटल प्रायव्हसीला आता थेट मूलभूत अधिकारांशी जोडून पाहिले जात आहे.

### प्रायव्हसी पॉलिसीवर तीव्र टीका

न्यायालयाने व्हॉट्सअॅपच्या प्रायव्हसी पॉलिसीवरही नाराजी व्यक्त केली. मुख्य न्यायाधीशांनी ही पॉलिसी ''भ्रामक आणि सामान्य माणसाला न समजणारी'' असल्याचे सांगितले. उदाहरण देताना त्यांनी म्हटले की, एखादी गरीब वृद्ध महिला, रस्त्यावर फळे–वस्तू विकणारा माणूस किंवा फक्त प्रादेशिक भाषा समजणारा युजर या अटी कशा समजून घेणार? असा सवाल न्यायालयाने केला आहे.

## मुंबईचा महापौर जवळपास निश्चित?

मुंबई । प्रतिनिधी

**मुंबई महापालिकेच्या महापौर पदावर कोणाची वर्णी लागणार, याकडे संपूर्ण मुंबईकरांचे लक्ष लागले आहे. यावेळी महापौर पदासाठी खुला–महिला प्रवर्ग जाहीर झाल्याने, खुल्या प्रवर्गातील महिला नगरसेविकाच महापौर होणार, हे निश्चित झाले आहे. त्यामुळे महायुतीत हालचालींना वेग आला आहे.**

मुंबई महापालिका निवडणुकीचा निकाल लागून १५ दिवसांहून अधिक कालावधी झाला आहे. महायुतीने स्पष्ट बहुमत मिळवल्याने आता महापौर पदासाठीचा निर्णय अंतिम टप्प्यात आला आहे. निवडणुकीनंतर अनेक महिला नगरसेविकांची नावे चर्चेत होती, मात्र आता ही शर्यत तीन नावांवर येऊन थांबली आहे. सध्या महापौर पदासाठी शितल गंभीर, रितू तावडे आणि राजश्री शिरवाडकर या तीन महिला नगरसेविकांची नावे प्रामुख्याने चर्चेत आहेत. महापौर पदाच्या शर्यतीत

▶▶ पान २ वर

cmyk

## अग्रलेख


# ...तर संसदेवर विश्वास कमी होईल !

लोकसभेत घडलेली घटना भारतीय संसदीय लोकशाहीच्या वर्तमान स्थितीचे स्पष्ट दर्शन घडवते. विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील आभार प्रस्तावावर बोलताना 'द कारव्हान' मासिकातील एका लेखाचा आधार घेऊन माजी लष्करप्रमुख जनरल मनोज मुकुंद नरवणे यांच्या अप्रकाशित आत्मचरित्र 'फोर स्टार्स ऑफ डेस्टिनी' मधील उतारे वाचण्याचा प्रयत्न केला. या प्रयत्नाने सभागृहात जोरदार गोंधळ उडाला, संरक्षणमंत्री राजनाथ सिंह, गृहमंत्री अमित शाह, किरेन रिजिजू यांनी तीव्र आक्षेप घेतले आणि अध्यक्ष ओम बिर्ला यांनी नियम ३४९ चा हवाला देत चर्चा रोखली. परिणामी, सभागृह अनेकदा तहकूब झाले आणि मंगळवारपर्यंत स्थगित राहिले. या वादाचे मूळ जनरल नरवणे यांच्या अप्रकाशित पुस्तकातील उतारे उद्धृत केले आहेत. हे उतारे मुख्यत: २०२० च्या पूर्व लडाख सीमावादाशी (गलवान-रेचिन ला) संबंधित आहेत. नरवणे यांच्या मते, ३१ ऑगस्ट २०२० रोजी चिनी टँक्स आणि सैन्याने रेचिन ला दिशेने हालचाल केली, ज्यामुळे भारतीय सैन्याच्या काही पदांपर्यंत धोका निर्माण झाला. त्यांनी लिहिले आहे की, 'प्रत्येकाला माझा प्रश्न होता, मी आदेश काय द्यावा?' राजनाथ सिंह यांनी त्यांना 'जो उचित समजेल ते करा' असे सांगितले, ज्याचा अर्थ 'कार्ट ब्लँच' (पूर्ण स्वातंत्र्य) देण्यात आला. हे उतारे सरकारच्या चीन धोरणावर, विशेषत: २०२० च्या संकट हाताळणीवर प्रश्न उपस्थित करतात की राजकीय नेतृत्वाने जबाबदारी लष्करावर टाकली आणि नंतर 'स्पिन' करून यश दाखवले. राहुल गांधी यांनी हे उतारे वाचण्याचा प्रयत्न केला, कारण भाजप खासदार तेजस्वी सूर्य यांनी काँग्रेसला 'देशभक्त नसल्याचा' आरोप केला होता.

राहुल यांनी म्हटले, 'सरकार दहशतवादाविरुद्ध लढत असल्याचा दावा करत असताना एका मजकुराची भीती का?' ते डोकलामचा उल्लेख करत असले तरी, लेखात मुख्यत: २०२० लडाखचा संदर्भ आहे, ज्यात चिनी टँक्स भारतीय तळाजवळ पोहोचल्या होत्या. हा मुद्दा सरकारच्या परराष्ट्र धोरण, सीमावाद हाताळणी आणि लष्कराच्या स्वायत्ततेवर प्रकाश टाकतो. सत्ताधारी पक्षाने याला नियमांचा मुद्दा बनवले. राजनाथ सिंह यांनी सांगितले की, अप्रकाशित पुस्तकाचा उल्लेख दिशाभूल करणारा आहे. अमित शाह यांनी म्हटले की, मासिक काहीही लिहू शकते. अध्यक्ष बिर्ला यांनी नियम ३४९(१) चा हवाला देत सांगितले की, सभागृहात पुस्तक, वर्तमानपत्र किंवा असंबंधित मजकूर वाचता येत नाही. निशिकांत दुबे यांनी 'सॅटॅनिक वर्सेस' चा दाखला देत काँग्रेसच्या काळातील प्रथा सांगितली. राज्यघटना कलम १९(२) च्या आधारावर राष्ट्रीय सुरक्षेच्या नावाने मर्यादा असल्याचेही सांगितले गेले. विरोधकांनी मात्र हे सार्वजनिक हिताचे म्हणून पाठिंबा दिला. प्रियांका गांधी, अभिषेक मनु सिंघवी, अरविंद सावंत यांनी सांगितले की, माजी लष्करप्रमुखांच्या मतांना दाबणे चुकीचे आहे. पुस्तक प्रकाशित होऊ दिले नाही, म्हणजे सरकार लपवण्याचा प्रयत्न करत आहे. पूर्व लोकसभा सेक्रेटरी जनरल पी.डी.टी. आचार्य यांच्या मते, अप्रकाशित मजकुराचा उल्लेख करता येतो, पण सत्यतेची हमी द्यावी लागते; अन्यथा ब्रिच ऑफ प्रिव्हिलेज होऊ शकते.

ही घटना दोन गोष्टी स्पष्ट करते: एक, संसदेत अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि नियम यांच्यातील ताण. नियम ३४९ सारखे प्रावधानावर चर्चा नियंत्रित करण्यासाठी आहेत, पण त्यांचा दुरुपयोग मुद्दे टाळण्यासाठी होतो. दुसरे, राष्ट्रीय सुरक्षेच्या नावाखाली अस्वस्थ करणाऱ्या सत्यांना दाबण्याची प्रवृत्ती. जनरल नरवणे हे सामान्य व्यक्ती नव्हते; त्यांचे अनुभव राष्ट्रीय हिताचे आहेत. पुस्तक अप्रकाशित राहिले तरी, माध्यमातून उतारे सार्वजनिक झाले आहेत. सरकारने ते प्रकाशित होऊ दिले असते तर हे वाद टाळता आले असते. या घटनेतून स्पष्ट होते की, संसद उत्पादक चर्चेसाठी नव्हे तर राजकीय नाटकासाठी वापरली जात आहे. राहुल गांधींचा हा प्रयत्न राजकीय स्टंट असू शकतो, पण तो सरकारच्या कमकुवत धोरणांवर प्रकाश टाकतो. चीन सीमेवर २०२० पासून काय घडले, हे पूर्ण सत्य जनतेसमोर येणे गरजेचे आहे. लष्करप्रमुखांच्या मतांना दाबणे हे लष्कराच्या नैतिकतेवर आणि लोकशाहीच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह उभे करते. शेवटी, लोकशाही मजबूत होण्यासाठी संसदेत नियमांचा आदर आणि मुद्द्यांवर मुक्त चर्चा दोन्ही आवश्यक आहेत. अप्रकाशित पुस्तकाचा वाद संपवण्याऐवजी, सरकारने सीमावाद, लष्कराची तयारी आणि धोरणांवर खुली चर्चा घ्यावी. अन्यथा, असे गोंधळ वाढत राहतील आणि जनतेचा संसदेवर विश्वास कमी होईल. सत्य लपवण्यापेक्षा उघड करणे हेच खरे देशभक्तीचे लक्षण आहे. सरकारने यावर चर्चा न टाळता आपले मुद्दे ठेवावेत आणि संसद बंद पडण्यात जाणारा वेळ वाचवावा. अशा काळात आठवण येते अरुण जेटली यांची. ते भारतीय राजकारणातील एक प्रभावी वक्ते आणि रणनीतिकार होते. ते २००९ ते २०१४ पर्यंत राज्यसभेत विरोधी पक्षनेते म्हणून कार्यरत होते. या काळात संसदेत अनेकदा गोंधळ आणि तहकूबी होत असताना, जेटलींनी विरोधी पक्ष म्हणून गोंधळाला कायदेशीर रणनीती म्हणून समर्थन केले होते. त्यांच्या मते, जर सरकार संसदीय जबाबदारी टाळत असेल आणि चर्चा दाबण्याचा प्रयत्न करत असेल, तर विरोधकांना संसद रोखणे हा शेवटचा पर्याय असतो. २०१०-२०११ च्या २ जी घोटाळा प्रकरणात जेटलींनी भाजपच्या नेतृत्वाखाली संसदेत सातत्याने गोंधळ घालून सरकारला संयुक्त संसदीय समितीची मागणी मान्य करण्यास भाग पाडले. सरकारला २ जी स्पेक्ट्रम वाटपाची चौकशी मान्य करावी लागली. जेटलींनी नंतर सांगितले की, अशा रणनीतीमुळे ३ जी लिलावातून प्रचंड महसूल मिळाला. २०११ मध्ये अण्णा हजारे चळवळ आणि जन लोकपाल विधेयकावर जेटलींनी संसदेत चर्चा घडवून आणण्यासाठी विरोधी पक्षाची भूमिका मजबूत केली. त्यांनी सरकारच्या विरोधात संसद रोखण्याला समर्थन दिले, कारण सरकार लोकपाल विधेयकावर चर्चा टाळत होते. यामुळे जन लोकपाल विधेयकावर मोठी चर्चा झाली. तेच महागाई आणि इतर मुद्द्यांवर केले.

## ज्ञानसागर गुरुकुल मध्ये स्व.उपमुख्यमंत्री अजित पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली



बीड । प्रतिनिधी

आपल्या महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री व बीड जिल्ह्याचे पालकमंत्री स्व. अजित दादा पवार यांना ज्ञानसागर गुरुकुल व मातृभूमी प्रतिष्ठानच्या वतीने दिनांक १ फेब्रुवारी २०२६ रोजी ज्ञानसागर गुरुकुल मध्ये भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. आरंभी वाहतूक शाखेचे पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर, शिवाजीनगर पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक वसुदेव मिसाळ, वाहतूक शाखेचे पोलीस हवालदार आजिनाथ मुंडे, पालक प्रतिनिधी राजकुमार हांगे. सामाजिक कार्यकर्ते डॉ. संजय तांदळे, प्रा.बाळासाहेब नागरगोजे, ज्ञानसागर गुरुकुलचे गणेश सानप, स्वाती सानप, रवी सानप, होले मामा यांच्या हस्ते स्व. अजितदादा पवार यांच्या प्रतिमेचे माल्यार्पणाने पूजन करण्यात आले. याप्रसंगी गणेश सानप ,डॉ. संजय तांदळे, विजय जाधवर, वसुदेव मिसाळ आदींनी स्व. अजितदादा पवार यांच्या जीवन कार्याचा आढावा घेतला. शेवटी विद्यार्थ्यांसह सर्वांनी दोन मिनिटाचे मौन पाळून स्व. अजित दादा पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

# गुत्तेदाराची दादागिरी; संपादकाला अर्वाच्य भाषेत शिवीगाळ अन् धक्काबुक्की!

जालना । प्रतिनिधी

**जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागात बातमीच्या संदर्भात माहिती घेण्यासाठी गेलेले 'दैनिक जनश्वास'चे संपादक भरत मानकर यांना एका गुत्तेदाराने अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करत धक्काबुक्की केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या घटनेमुळे जिल्हा परिषद वर्तुळात खळबळ माजली असून, संबंधित गुत्तेदारावर कठोर कायदेशीर कारवाई करण्यासह त्याला माहिती पुरवणाऱ्या भ्रष्ट अधिकारी-कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.**

सोमवार, २ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी १ ते १:३० च्या सुमारास भरत मानकर हे बांधकाम विभागातील सहाय्यक लेखाधिकारी श्री. हारुण यांच्या केबिनमध्ये बसले होते. यावेळी त्या ठिकाणी 'बांगड' नावाचा गुत्तेदार आला. मानकर हे बातमीसाठी माहिती गोळा करत असल्याचे कळताच या गुत्तेदाराचा संयम सुटला. त्याने "कोण पत्रकार आहे..." म्हणत अत्यंत खालच्या पातळीवर जाऊन गलिच्छ भाषेत शिवीगाळ केली. एवढ्यावरच न थांबता "आमच्या कामाचे बिल रोखण्याचा प्रयत्न करतोय, याचे हातपाय तोडून टाकू, याला लय मस्ती आली आहे," अशा धमक्या देत त्याने मानकर यांना धक्काबुक्की केली.

**जीवे मारण्याची धमकी आणि तक्रार**

या गुत्तेदाराने मानकर यांना जीवे मारण्याची धमकी दिली असून, त्यांच्या जीवितास धोका निर्माण झाला आहे. याप्रकरणी कदीम जालना पोलीस ठाण्यात पत्रकार संरक्षण कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

**प्रशासनातील 'घरभेदी' कोण?**

एखादा पत्रकार शासकीय कार्यालयात माहिती घेण्यासाठी आला आहे, ही बातमी तात्काळ संबंधित गुत्तेदारापर्यंत पोहोचतेच कशी? असा संतप्त सवाल आता उपस्थित होत आहे. बांधकाम विभागातील कोणत्या कर्मचाऱ्याने किंवा अधिकाऱ्याने ही माहिती गुत्तेदाराला दिली, याची सखोल चौकशी करून त्या संबंधित कर्मचाऱ्याला तात्काळ निलंबित करावे, अशी आक्रमक मागणी भरत मानकर यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

**कामांच्या चौकशीची मागणी**

या गुत्तेदाराने केलेल्या कामांमध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता आणि भ्रष्टाचार झाल्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे. भ्रष्टाचार उघड होईल या भीतीपोटीच त्याने पत्रकारावर हल्ला करण्याचा प्रयत्न केला असावा, असा संशय व्यक्त करत या गुत्तेदाराच्या सर्वच कामांची तातडीने चौकशी करण्याची मागणीही मानकर यांनी केली आहे.

# केंद्र व राज्याप्रमाणेच जिल्हा परिषदेतही भाजपची सत्ता आणा-ना.पंकजा मुंडे





## किनगाव, जळकोट, जानवळमध्ये जोरदार सभा

लातूर । प्रतिनिधी

केंद्र व राज्या प्रमाणे लातूर जिल्हा परिषदेतही भाजपची सत्ता असायला हवी. भाजप हा ग्रामीण भागाच्या विकासाला आणि सर्व सामान्य जनतेच्या हिताला प्राधान्य देणारा पक्ष आहे, त्यामुळे येत्या ७ तारखेला भाजप महायुतीचे उमेदवार मोठया मताधिक्याने विजयी करा असे आवाहन राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी आज जाहीर सभांमधून बोलतांना केले.

ना. पंकजाताई मुंडे यांच्या आज लातूर जिल्हयातील किनगाव, जळकोट, जानवळ येथे जोरदार सभा झाल्या. या तीनही ठिकाणी सभेला तुफान गर्दी होती. सभेस संबोधित करताना पंकजाताई म्हणाल्या, अहमदपूर-चाकूर मतदारसंघ आणि परिसरावर लोकनेते मुंडे साहेबांनी खूप प्रेम केले आहे, मी सुध्दा या भागाच्या विकासाला नेहमीच प्राधान्य दिले आहे. ग्रामविकास मंत्री असताना जलसंधारणाची कामे, ग्रामपंचायत कार्यालय, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना आदी असंख्य योजना राबवून कोटयवधीचा निधी आणला. बीड परळीसारखेच प्रेम दिले. आता राज्यात महायुतीचे सरकार आहे, अजितदादा अर्थमंत्री होते, त्यांच्या अकाली जाण्याचा धक्का आम्हा सर्वाना बसला आहे, आता सुनेत्रा ताई व आम्ही सर्व जण या भागाच्या विकासाला कुठे कमी पडणार नाहीत. ग्रामीण भागाच्या विकासाला गती देण्यासाठी केंद्र व राज्यात जशी भाजपची सत्ता आहे तशी सत्ता जिल्हा परिषदेत आणावी लागेल, त्यासाठी आमच्या उमेदवारांना प्रचंड मताधिक्य द्या असं त्या म्हणाल्या. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ग्रामीण जनतेच्या कल्याणाकडे विशेष लक्ष केंद्रित केले आहे, अनेक योजना त्यासाठी आणल्या आहेत तर दुसरीकडे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लाडकी बहीण योजना प्रभावीपणे राबवून महिलांना सक्षम केले आहे असं सांगून इथल्या मन्याड नदीच्या पुनरुज्जीवनाचा प्रश्न मार्गी लावू असं ना. पंकजाताईंनी सांगितलं. सभेला सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, माजी आमदार गोविंदराव केंद्रे, बब्रुवान खंदाडे, गणेश हाके, राहूल केंद्रे आदींसह पदाधिकारी उपस्थित होते. ना. पंकजाताई मुंडे सकाळी छत्रपती संभाजीनगर येथून हेलिकॉप्टरने लातूर जिल्हयातील सभांना निघणार होत्या परंतू तांत्रिक बिघाड झाल्याने त्यांचे हेलिकॉप्टर नियोजित वेळेपेक्षा तीन तास उशीराने टेक ऑफ झाले, परिणामी सभा देखील उशीराने सुरू झाल्या, एवढा उशीर होऊनही सर्वच सभांना मतदारांनी मोठी गर्दी केल्याचे पहायला मिळाले.

## दहावीच्या विद्यार्थ्यांना सवलतीच्या कलागुणांच्या प्रस्तावांसाठी १८ फेब्रुवारी पर्यंत मुदतवाढ -डॉ. संजय तांदळे

बीड । प्रतिनिधी

राज्यातील शालांत प्रमाणपत्र फेब्रुवारी-मार्च २०२६ परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांना कलागुणांसाठी दिल्या जाणाऱ्या सवलतीच्या गुणांच्या प्रस्तावांसाठी यंदा विशेष बाब म्हणून मुदतवाढ देण्याचा निर्णय महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने घेतला होता. त्यानुसार शाळांना ३१ जानेवारी २०२६ पर्यंत कलागुणांचे प्रस्ताव विभागीय मंडळाकडे सादर करण्याची मुदतवाढ देण्यात आली होती. परंतु शासकीय रेखाकला परीक्षेचा (एलिमेंटरी आणि इंटरमिजिएट ग्रेड)निकाल नुकताच जानेवारीच्या शेवटच्या आठवड्यात जाहीर झाल्यामुळे राज्य मंडळाचे सचिव दीपक माळी यांनी याबाबत परिपत्रकाद्वारे प्रस्ताव शाळेने संबंधित विभागीय मंडळाकडे दि. १८ फेब्रुवारी २०२६ पर्यंत सादर करण्यास मुदत वाढ दिली आहे. त्याबाबत राज्यातील सर्व विभागीय मंडळांना सूचना दिल्या आहेत. शास्त्रीय कला, चित्रकला क्षेत्रात प्राविण्य मिळवणाऱ्या, लोककला प्रकारांमध्ये सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना सवलतीचे अतिरिक्त गुण देण्यात येतात. या कलागुणांसाठीचे प्रस्ताव शाळेने संबंधित विभागीय मंडळाकडे दि.१८ फेब्रुवारी २०२६ पर्यंत पाठवण्याचे आदेश दिले आहेत. शास्त्रीय कला, चित्रकला आणि लोककलांसाठीचे प्रस्ताव इच्छुक विद्यार्थ्यांनी संबंधित शाळेकडे वेळेत सादर करण्याचे आवाहन शिक्षण व करियर कौन्सिलर डॉ. संजय तांदळे यांनी केले आहे.

# पान १ वरून...

### पंतप्रधानांनी शेतकऱ्यांच्या

असा आरोप करत नरेंद्र मोदी घाबरले आहेत, कारण ज्या लोकांनी त्यांची प्रतिमा घडवली, तेच आता ती उद्ध्वस्त करण्याचा प्रयत्न करत आहेत असे ते म्हणाले.

-------------

### पुणे आणि बीडच्या पालकमंत्रीपदी

बीड हे दोन्ही जिल्हे राजकीयदृष्ट्या अत्यंत संवेदनशील आहेत. पुण्यात पायाभूत सुविधांचे प्रकल्प मार्गी लावणे आणि बीडमधील राजकीय समीकरणे हाताळणे आणि कायदा सुव्यवस्था संभाळणे हे सुनेत्रा पवार यांच्यासमोरील मुख्य आव्हान असणार आहे.

--------------

### पंकजा मुंडेंच्या हेलिकॉप्टरमध्ये

रवाना होणार होत्या. मात्र, हेलिकॉप्टर हवेत झेप घेण्यापूर्वीच वैमानिकाला तांत्रिक अडचण जाणवल्याने सुरक्षेच्या कारणास्तव तातडीने उड्डाण रद्द करण्यात आले. सुदैवाने मोठा अनर्थ टळला असून, कार्यकर्त्यांची गैरसोय टाळण्यासाठी तातडीने पर्यायी हेलिकॉप्टरची व्यवस्था करण्यात आली. थोड्या विलंबाने का असेना, पंकजा मुंडे लातूर आणि सोलापूरमधील आपल्या नियोजित सभांना उपस्थित राहणार असल्याचे त्यांच्या कार्यालयाकडून स्पष्ट करण्यात आले.

------------

### बीड जिल्ह्यात वर्षभरात

जिल्हास्तरीय समितीच्या बैठकीत तपासून १९३ प्रकरणे मदतीसाठी पात्र ठरवली आहेत. यापैकी १६८ मयत शेतकऱ्यांच्या वारसांना प्रत्येकी एक लाख रुपयांची शासकीय मदत वितरित करण्यात आली आहे. तर ३४ प्रकरणे अपात्र ठरवण्यात आली असून २९ प्रकरणे चौकशीअंती प्रलंबित असल्याची माहिती निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी दिली आहे.

**नोव्हेंबर महिन्यात सर्वाधिक आत्महत्या**

आकडेवारीनुसार नोव्हेंबर २०२५ हा सर्वाधिक धक्कादायक महिना ठरला असून या एका महिन्यात ३८ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. हे प्रमाण शासनाच्या शेतकरी कल्याण योजनांवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारे आहे.

**शासनाच्या उपाययोजना अपयशी : डॉ. गणेश ढवळे**

सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांनी शासनाच्या शेतकरी कल्याणाच्या उपाययोजनांवर तीव्र टीका करताना म्हटले की, "शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी शासनाकडून विविध योजना राबवल्या जातात, मात्र त्या केवळ कागदोपत्रीच असून प्रत्यक्षात त्या प्रभावी ठरत नाहीत. त्यामुळे आत्महत्यांचे सत्र थांबत नसल्याची खंत आहे. सरकारने केवळ आर्थिक मदतीपुरते मर्यादित न राहता कर्जमाफी, हमीभाव, पीकविमा, सिंचन सुविधा आणि मानसिक आधार यावर भर देणे गरजेचे आहे."

**शेतकरी कुटुंबांची विदारक स्थिती**

शेतकरी आत्महत्येमुळे अनेक कुटुंबे उघड्यावर येत असून, मुलांचे शिक्षण, कुटुंबाचा उदरनिर्वाह आणि सामाजिक सुरक्षितता धोक्यात येत आहे. त्यामुळे तात्काळ प्रभावी धोरणे आणि दीर्घकालीन उपाययोजना राबवण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

-----------

### रोहित पवारांना कोर्टाने

नवीन सदस्य म्हणून रोहित पवार यांच्या पत्नी कुंती पवार, सासरे सतीश मगर, खासदार सुप्रिया सुळे यांची कन्या रेवती सुळे आणि बारामती ॲग्रोचे सुभाष गुळवे यांच्यासह ३० हून अधिक राष्ट्रवादीच्या नेत्यांची नावे अचानक घुसवण्यात आली. या सदस्यांची नोंदणी करताना कायदेशीर प्रक्रियेचे पालन केले गेले नाही आणि इतक्या मोठ्या संख्येने सदस्य वाढवून मतदारांची यादी बदलण्यात आली, असा आरोप करण्यात आला आहे. जर तुमच्या या (मतदार) यादीत काही खेळाडू असते, तर आम्ही कदाचित हे चालू दिले असते. पण तुमच्या यादीत असे लोक आहेत ज्यांना बॅट कशी पकडायची हे सुद्धा माहित नाही. आम्हाला यापेक्षा जास्त बोलायला लावू नका. जर क्रिकेटपटूंसाठी नसेल, तर मग ही असोसिएशन नेमकी आहे तरी कोणासाठी? असा सवाल करण्यात आला आहे.

------------

### न्यायालयीन कर्मचाऱ्यांना निवडणूक

कर्मचाऱ्यांना निवडणूक कर्तव्यातून सूट देण्याची विनंती केली होती; तर नोंदणी अधिकारी (निरीक्षण) यांनीही महापालिका आयुक्तांना तसे कळविले. मात्र आयुक्तांनी २९ डिसेंबरला मुख्य न्यायदंडाधिकाऱ्यांना पत्र पाठवून कनिष्ठ न्यायालयांतील कर्मचाऱ्यांना सूट देण्याची विनंती नाकारत कारवाईचा बडगा उगारला. या पत्राची उच्च न्यायालयाने स्वतःहून दखल घेऊन सु-मोटो याचिका दाखल करून घेतली आहे. खंडपीठाने पालिका आयुक्तांच्या अधिकार क्षेत्रावर प्रश्न उपस्थित करत जिल्हा निवडणूक अधिकारी म्हणून काम पाहणाऱ्या आयुक्तांनी न्यायालयीन कर्मचाऱ्यांना निवडणूक कर्तव्यावर हजर राहण्याचा आदेश कोणत्या अधिकार क्षेत्रात घेतले याबाबत जाब विचारला. न्यायालयाच्या दणक्यानंतर आयुक्तांनी चूक मान्य करून निर्णय मागे घेतल्याचे सांगितले होते. या याचिकेप्रकरणी राज्याचे निवडणूक आयोगाचे उपसचिव के. सूर्यकृष्णमूर्ती यांनी प्रतिज्ञापत्र सादर केले. पालिका निवडणुकीत कर्मचाऱ्यांची उपलब्धता व्हावी यासाठी राज्य निवडणूक आयोगाकडे विशेष अधिकार आहेत. त्यानुसार सर्वोच्च न्यायालयाने किशनसिंग तोमर विरुद्ध अहमदाबाद महानगरपालिका खटल्यात स्पष्ट केल्यानुसार राज्य निवडणूक आयोगाचे अधिकार त्यांच्या कार्यक्षेत्रात निवडणूक आयोगाच्या अधिकारांइतकेच व्यापक आहेत. मुक्त निवडणुकीसाठी आयोग आपल्या विशेष अधिकारांचा वापर करून आदेश देऊ शकतो, असा दावा केला. खंडपीठाने याची नोंद घेत सुनावणी दोन आठवडे तहकूब ठेवली.

-----------

### वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर

झाल्यानंतर दंड आकारला गेल्यास, तो भरण्यासाठी किंवा त्यावर आक्षेप नोंदवण्यासाठी चालकाला ४५ दिवसांचा अवधी दिला जाईल. या कालावधीत चालकाने दंड भरणे किंवा आपली बाजू संबंधित यंत्रणेकडे मांडणे आवश्यक आहे. अनेकांना किरकोळ नियमभंगाचे गांभीर्य वाटत नाही; मात्र आता सीटबेल्ट न लावणे, वाहतूक सिग्नल तोडणे, चुकीच्या दिशेने वाहन चालवणे, हेल्मेट न वापरणे अशा प्रत्येक उल्लंघनाची नोंद केली जाणार आहे. हे सर्व नियमभंग मोजले जातील आणि पाचव्यांदा उल्लंघन झाल्यास संबंधितावर कडक कारवाई करण्यात येईल. वाढत्या अपघातांची आकडेवारी लक्षात घेऊन केंद्रीय मोटार वाहन कायदा, १९८९ मधील तरतुदींमध्ये दुरुस्ती करण्यात आली आहे. तांत्रिक पाळत ठेवून ही यंत्रणा राबवली जाणार आहे. दरम्यान, आता केवळ दंड भरून सुटका होणार नाही. नियमांकडे दुर्लक्ष करणा-या वाहनचालकांसाठी हा नवीन कायदा मोठा इशारा ठरणार आहे. रस्ते सुरक्षेला अधिक बळकटी देण्यासाठी केंद्र सरकारने हे पाऊल उचलले आहे. एका वर्षात चालकाने पाच वेळा वाहतूक नियमांचे उल्लंघन केल्यास त्याचा वाहनचालक परवाना कायमस्वरूपी रद्द केला जाईल. यासोबतच संबंधित वाहनाची प्रादेशिक परिवहन कार्यालयातील नोंदणीही रद्द करण्यात येईल, त्यामुळे ते वाहन रस्त्यावर चालवणे बेकायदेशीर ठरेल.

**वाहन चालकाला अपील करण्याची संधी**

एखाद्या चालकाला आपल्यावर चुकीच्या पद्धतीने कारवाई झाल्याचे वाटत असल्यास त्याला संबंधित प्राधिकरणाकडे अपील करण्याची संधी देण्यात येईल. ही प्रक्रिया पारदर्शक ठेवण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. मात्र अपील फेटाळले गेल्यास किंवा चालकाने आपली चूक मान्य केल्यास ४५ दिवसांच्या आत दंड भरणे बंधनकारक असेल. दंड न भरता पुन्हा नियमभंग केल्यास कारवाईची प्रक्रिया अधिक वेगाने राबवली जाईल अशी माहिती नागपुरातील प्रादेशिक परिवहन अधिका-यांनी दिली आहे. हवे असल्यास मी हे अधिक बातमीसदृश, संक्षिप्त, किंवा ठळक मथळ्यांसहही मांडून देऊ शकतो.

-------------

### मुंबईचा महापौर

शितल गंभीर यांचे नाव सध्या आघाडीवर असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. त्या भाजपच्या मुंबई महिला मोर्चाच्या अध्यक्षा आहेत. शिवाजी पार्क येथील सभेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांचा विशेष उल्लेख करत कौतुक केले होते. शितल गंभीर या दुसऱ्यांदा मुंबई महापालिकेवर निवडून आल्या आहेत. २०१७ आणि २०२४ या दोन्ही निवडणुकांमध्ये त्यांनी भाजपच्या तिकीटावर विजय मिळवला. माहीम-दादर मतदारसंघात ठाकरे गटाच्या वैशाली पाटणकर यांचा त्यांनी अवघ्या १२५ मतांनी पराभव केला. त्या शिवसेनेचे माजी आमदार सुरेश गंभीर यांच्या कन्या आहेत. रितू तावडे या भाजपच्या ज्येष्ठ आणि अनुभवी नगरसेविका मानल्या जातात. २०१२ मध्ये घाटकोपरमधून त्यांनी पहिल्यांदा विजय मिळवला. त्यानंतर सलग तीन निवडणुकांत त्या विजयी ठरल्या आहेत. त्यांनी मुंबई महापालिकेच्या शिक्षण समितीचे अध्यक्षपदही भूषवले आहे. त्यामुळे त्या महापौर पदाच्या मजबूत दावेदार मानल्या जात आहेत. भाजपच्या राजश्री शिरवाडकर या सलग तीन वेळा नगरसेवक म्हणून निवडून आल्या आहेत. २०१२, २०१७ आणि २०२६ या निवडणुकांमध्ये त्यांनी विजय मिळवला आहे. सध्या त्या भाजप मुंबई महिला मोर्चाच्या सरचिटणीस म्हणून कार्यरत आहेत. या तिघांव्यतिरिक्त तेजस्वी घोसाळकर, अलका केरकर, हर्षिता नार्वेकर, आशा मराठे आणि योगिता कोळी यांची नावेही महापौर पदासाठी चर्चेत आहेत. मात्र अंतिम निर्णय महायुतीच्या वरिष्ठ पातळीवरील बैठकीनंतरच स्पष्ट होणार आहे.

----------

### व्हॉट्सअप- मेटा भारतातून

तर त्यांची याचिका फेटाळली जाऊ शकते, असा इशाराही न्यायालयाने दिला. हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात मेटा आणि व्हॉट्सॲपने दाखल केलेल्या याचिकेशी संबंधित आहे. या याचिकेत त्यांनी च्या आदेशाला आव्हान दिले आहे, ज्यामध्ये स्पर्धा आयोगाने ओटीटी मेसेजिंगमध्ये गैरवापर केल्याबद्दल मेटाला २१३ कोटी रुपयांचा दंड ठोठावला होता. सुनावणीदरम्यान न्यायालयाने डेटा प्रायव्हसी, डेटा वापर आणि त्याच्या आर्थिक मूल्यावर गंभीर प्रश्न उपस्थित केले. न्यायालयाने स्पष्ट केले की, कोणत्याही कंपनीला देशातील नागरिकांच्या अधिकारांवर गदा आणण्याची परवानगी दिली जाऊ शकत नाही. भारतात काम करायचे असेल, तर देशाच्या डेटा संरक्षण नियमांचे काटेकोर पालन करणे बंधनकारक आहे, असेही न्यायालयाने ठणकावून सांगितले. सुनावणीदरम्यान सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी डेटा हा आर्थिक मूल्य असलेला घटक असल्याचे नमूद केले. यावर न्यायालयाने डेटा संरक्षण कायद्याचा संदर्भ देत प्रश्न उपस्थित केला की, जर वैयक्तिक डेटाच्या वापराचे आणि शेअरिंगचे मूल्यच निश्चित नसेल, तर ते न्याय्य कसे ठरू शकते? प्रत्येक टप्प्यावर डेटाचा वापर, विश्लेषण, जाहिराती आणि कमाईसाठी कसा केला जातो, याची तपासणी होणे आवश्यक असल्याचे न्यायालयाने नमूद केले.

----------

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
बुधवार दि. ४ फेब्रुवारी २०२६



## थोडक्यात

### इल्म,खिदमत आणि संस्कारांचा वारसा शेख युनुस हमीद सर यांची सेवानिवृत्ती

माजलगाव । प्रतिनिधी

इल्म म्हणजे उजेड आणि खिदमत म्हणजे समाजाप्रती जबाबदारी. हा उजेड आणि ही खिदमत आयुष्यभर प्रामाणिकपणे जपणारे तालुका माजलगाव येथील शिक्षण विस्तार अधिकारी श्री. शेख युनुस हमीद आज सेवा निवृत्त होत आहेत. हा क्षण केवळ एका शासकीय सेवेला निरोप देणारा नसून, शिक्षण, संयम आणि माणुसकीच्या दीर्घ प्रवासाचा सन्मान आहे.



सेवाकालात त्यांनी शिक्षणाला केवळ नोकरी न मानता इबादत समजून काम केले. शाळा, शिक्षक, विद्यार्थी आणि पालक यांच्याशी त्यांनी नेहमी आपुलकीने संवाद साधला.अडचणी ऐकून घेणे, सबुरीने मार्ग दाखवणे आणि योग्य निर्णय घेणे, हीच त्यांची ओळख होती. ग्रामीण व दुर्गम भागातील शाळांसाठी त्यांनी विशेष मेहनत घेतली आणि शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले.आपल्या कुटुंबातूनही त्यांनी इल्मचा वारसा पुढे नेला आहे, हे विशेष अभिमानास्पद आहे. त्यांचा एक मुलगा मुंबई येथे एम.बी.बी.एस पूर्ण करून सध्या एम.डी. ऑर्थोपेडिक्सचे शिक्षण घेत आहे, तर दुसरा मुलगा इ. झहरीरलू चे शिक्षण घेत आहे. वडिलांच्या प्रामाणिक सेवेचे आणि शिक्षणावरील दृढ विश्वासाचे हे सुंदर प्रतिबिंब आहे. त्यांच्या स्वभावात नम्रता,वागण्यात शालीनता आणि निर्णयांत इंसाफ होता. सहकाऱ्यांसाठी ते रहबर ठरले,तर अनेक शिक्षक व विद्यार्थ्यांसाठी प्रेरणास्थान बनले. आज ते पदावरून निवृत्त होत असले तरी, त्यांच्या कार्याचा ठसा शिक्षण क्षेत्रातून कधीही पुसला जाणार नाही. या सेवा निवृत्तीप्रसंगी शम्स अल्पसंख्याक बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, टाकरवन यांच्या वतीने तसेच संस्थेचे सचिव श्री. मोहसीन इनामदार, प्रा. डॉ. रफीक इनामदार सर, सर्व शिक्षक,अधिकारी व नातेवाईक यांनी श्री.शेख युनुस हमीद यांना शुभेच्छा दिल्या आहेत.

### कांचनाबाई गणपतराव जगतकर यांचे दुःखद निधन

परळी । प्रतिनिधी



येथील वैद्यनाथ बँकेचे संचालक प्रा. डॉ.विनोद जगतकर यांच्या मातोश्री श्रीमती कांचनाबाई गणपतराव जगतकर यांचे आज पहाटे साडेचार वाजता अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले आहे.आंबेडकरी चळवळीत त्यांचे मोठे योगदान होते.परळी येथील महिला महाविद्यालयाचे प्राध्यापक व वैद्यनाथ बँकेचे संचालक डॉ.विनोद जगतकर यांच्या मातोश्री श्रीमती कांचनबाई गणपतराव जगतकर यांचे आज दिनांक ३ नोव्हेंबर रोजी पहाटे अल्पशा आजाराने परळी शहरातील भिमनगर येथील राहत्या घरी दुखद निधन झाले.मृत्यू समयी त्या वय ८५ वर्षाच्या होत्या. त्यांच्या पश्चात तीन मुलं,पाच मुली सुना नातवंडे असा भरगच्च परिवार आहे. त्या सुरूवाती पासुन खुप मनमिळाऊ स्वभावाच्या, धार्मिक वृत्तीचा होत्या, त्यांच्या निधनाने संपूर्ण भिमनगर, जगतकर गल्ली परिसरात शोक काळा पसरली आहे. दिनांक ०३/ ०२/२६ रोजी सायंकाळी ०६ वाजता त्यांचा अंत्यविधी शांतीवन स्मशानभूमी भिमनगर परळी वैजनाथ या ठिकाणी होईल. आंबेडकरी चळवळीत त्यांचे मोठे योगदान होते.त्यांच्या निधनाने सर्वत्र हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. जगतकर परिवाराच्या दुःखात दै. राज्य लोकतंत्र परिवार सहभागी आहोत.

### राजमाता जिजाऊ महाविद्यालयाचा नखाते रोहित याची सीआयएसएफमध्ये निवड



किल्ले धारूर । प्रतिनिधी

येथील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित राजमाता जिजाऊ महाविद्यालयातील इयत्ता बारावी उत्तीर्ण झालेला नखाते रोहित तात्याबा (पहाडी पारगाव) याची दुर्ग, छत्तीसगड येथे (सीआयएसएफ) सेंट्रल इंडस्ट्रियल सेक्युरिटी फोर्स मध्ये प्रशिक्षणासाठी निवड झाल्याने महाविद्यालयाच्या वतीने प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे यांच्या हस्ते पुष्पहार व शाल देऊन स्वागत व सत्कार करण्यात आला. याप्रसंगी उपप्राचार्य प्रा. महादेव जोगडे, उपप्राचार्य मेजर डॉ. मिलिंद गायकवाड, पर्यवेक्षक प्रा. सच्चिदानंद ढेपे यांबरोबरच महाविद्यालयातील प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी, राष्ट्रीय छात्र सेनेचे कॅडेट्स व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## विद्यानिकेतन सीबीएससी पॅटर्न स्कूलची आंतरराष्ट्रीय भरारी ; पहिल्याच वर्षी ५८ विद्यार्थ्यांना सुवर्णपदक

परळी वैद्यनाथ । प्रतिनिधी

इंटरनॅशनल मॅथेमॅटिक्स ऑलिम्पियाड परीक्षा २०२५-२६ मध्ये विद्यानिकेतन सीबीएससी पॅटर्न स्कूलने उल्लेखनीय आणि अभिमानास्पद कामगिरी करत शैक्षणिक क्षेत्रात नावलोकिक मिळवला आहे.स्कुलच्या पहिल्याच वर्षात तब्बल ५८ विद्यार्थ्यांनी या आंतरराष्ट्रीय स्तरावरील प्रतिष्ठित परीक्षेत सहभाग नोंदवत सुवर्णपदक पटकावले आहे. ही कामगिरी केवळ स्कुलसाठीच नव्हे तर संपूर्ण परळी वैद्यनाथ शहरासाठी गौरवास्पद कामगिरी ठरली आहे. इंटरनॅशनल मॅथेमॅटिक्स ऑलिम्पियाड २०२५-२६ मध्ये विद्यानिकेतन स्कूलची सुवर्णकामगिरी, पहिल्याच वर्षात विद्यानिकेतन स्कूलचा मोठा विक्रम; ५८ विद्यार्थ्यांचे आंतरराष्ट्रीय यश, परळीच्या शैक्षणिक नकाशावर विद्यानिकेतन स्कूलचा ठसा; आयएमओ परीक्षेत सुवर्ण यश मिळवले आहे.

इंटरनॅशनल मॅथेमॅटिक्स ऑलिम्पियाड ही परीक्षा जगभरातील विद्यार्थ्यांच्या गणितीय क्षमता, तर्कशक्ती, विश्लेषणात्मक विचार आणि समस्यासोडवण्याच्या कौशल्यांची कसोटी पाहणारी अत्यंत आव्हानात्मक परीक्षा म्हणून ओळखली जाते. अशा स्पर्धेत विद्यानिकेतन सीबीएससी पॅटर्न स्कूलच्या पहिल्या वर्षातील विद्यार्थ्यांनी दाखवलेली सुवर्ण कामगिरी शाळेतील शैक्षणिक गुणवत्ता आणि मार्गदर्शनाची प्रचिती देणारी आहे.

विद्यानिकेतन सीबीएससी पॅटर्न स्कूलच्या ५८ विद्यार्थ्यांनी या परीक्षेत सहभाग नोंदविला होता आणि सर्व ५८ विद्यार्थ्यांनी सुवर्णपदक मिळवण्याची अभूतपूर्व कामगिरी केली. पहिल्याच वर्षात एवढ्या मोठ्या प्रमाणात यश मिळवणारी ही शाळा परळीच्या शैक्षणिक



क्षेत्रात आपले वेगळे स्थान निर्माण करत आहे.

विद्यानिकेतन स्कूलचे प्राचार्य संदीप मुंडे सर, शाळेचे व्यवस्थापक राकेश चांडक तसेच शिक्षक व कर्मचारी यांनी माहिती दिली. या यशाबद्दल प्राचार्य संदीप मुंडे सर, माहिती देताना सांगितले की, विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड गुणवत्ता आहे. योग्य मार्गदर्शन, शिस्तबद्ध अभ्यासक्रम आणि सातत्यपूर्ण सराव यामुळेच हे यश शक्य झाले आहे. आमचे उद्दिष्ट विद्यार्थ्यांना केवळ परीक्षाभिमुख न ठेवता आंतरराष्ट्रीय स्तरावर स्पर्धा करण्यास सक्षम बनवणे हे आहे.

विद्यानिकेतन सीबीएससी पॅटर्न स्कूल हे आपल्या पहिल्याच वर्षात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी उल्लेखनीय कार्य करत आहे. शैक्षणिक गुणवत्तेसोबतच शाळा विविध नाविन्यपूर्ण उपक्रम, सांस्कृतिक कार्यक्रम, समाजोपयोगी उपक्रम आणि स्पर्धात्मक परीक्षांचे मार्गदर्शन देत आली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, शिस्त आणि नेतृत्वगुण विकसित होत आहेत.

विद्यानिकेतन सीबीएससी पॅटर्न स्कूलने मिळवलेले हे यश निश्चितच आगामी काळात अनेक विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरणार असून, परळीचे नाव आंतरराष्ट्रीय शैक्षणिक पातळीवर उज्ज्वल होणार आहे. विद्यानिकेतन सीबीएससी पॅटर्न स्कूलच्या या सुवर्णयशाबद्दल शिक्षण सभापती योगेश मेनकुदळे, नगरसेवक सचिन सारडा आणि प्रणव परळीकर यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन केले असून, त्यांच्या उज्ज्वल शैक्षणिक भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत. त्यांनी विद्यानिकेतन स्कूलच्या व्यवस्थापन, प्राचार्य, शिक्षकवर्ग आणि पालकांचेही विशेष कौतुक केले आहे. आयएमओ २०२५-२६ परीक्षेत विद्यानिकेतन स्कूलच्या ५८ विद्यार्थ्यांना सुवर्णपदक, पहिल्याच वर्षात आंतरराष्ट्रीय स्तरावर ऐतिहासिक यश, शिस्तबद्ध अभ्यासक्रम व योग्य मार्गदर्शनाचे फळ, परळीच्या शैक्षणिक क्षेत्रात विद्यानिकेतन स्कूलचा नावलौकिक वाढवला आहे.

## स्वामी विवेकानंद विद्यामंदिर माध्यमिक शाळेचे स्नेहसंमेलन उत्साहात

केज । प्रतिनिधी

जीवन विकास शिक्षण मंडळ केज, संचलित स्वामी विवेकानंद विद्यामंदिर माध्यमिक विभाग केज या शाळेमध्ये शैक्षणिक वर्ष २०२५-२६ या वर्षामधील स्नेहसंमेलन कार्यक्रम अत्यंत हर्षोत्साहत पार पडला. या कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून सुनील केंद्रे गटशिक्षणाधिकारी, गट साधन केंद्र पंचायत समिती केज तर कार्यक्रमाच्या अध्यक्षा म्हणून सिताताई बनसोड नगराध्यक्षा, नगरपंचायत केज या उपस्थित होत्या. तर इतर प्रमुख उपस्थितीमध्ये अंकुशरावजी इंगळे अध्यक्ष, जीवन विकास शिक्षण मंडळ तथा सभापती, कृषी उत्पन्न बाजार समिती, संस्थेचे सचिव जी.बी. गदळे, नारायणराव अंधारे संस्थेचे संचालक तथा अध्यक्ष, शालेय व्यवस्थापन समिती स्वयंअर्थसहायित शाळा शैलाताई इंगळे अध्यक्षा, शालेय व्यवस्थापन समिती मा. वि. केज, शाळेच्या मुख्याध्यापिका शिवनंदा मुळे, प्राथमिक विभागाचे मु. अ. वसंत शितोळे, गणेश कोकीळ संस्थेचे सहसचिव तथा मु. अ. स्वामी विवेकानंद इंग्लिश स्कूल केज, शंकर भैरट प्राचार्य स्व. प्रमोद महाजन कनिष्ठ महा. केज संघपाल मस्के मु. अ. स्वामी विवेकानंद विद्यामंदिर स्वयंअर्थसहायित शाळा आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख उद्घाटक गटशिक्षणाधिकारी सुनील केंद्रे यांच्या हस्ते




दीपप्रज्वलनाने झाली. याप्रसंगी सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रबोधकांत समुद्रे व शाळेतील विद्यार्थिनी यांच्या परंपरागत वंदनीय अभ्यागतम, सुस्वागतम या स्वागत गीताने उपस्थित मान्यवरांचे स्वागत करण्यात आले.

यावेळी बोलताना सुनील केंद्रे म्हणाले, स्नेहसंमेलना सारख्या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळतो यामधून आदर्श कलाकार घडतात. जीवनामध्ये कोणतीही गोष्ट अशक्य नसते परंतु ती मिळविण्यासाठी आपण सदैव कार्यमग्न असावे लागते.अध्यक्षीय समारोपात सिताताई बनसोड म्हणाल्या, या शाळेमध्ये खरोखरच केवळ शैक्षणिक गुणवत्ता नव्हे तर विद्यार्थ्यांमध्ये नैतिक मूल्य देखील रुजवले जातात. अशा सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करून आपल्या देशाची खरी संस्कृती, परंपरा जोपासली जाते. सहभागी विद्यार्थ्यांनी शेतकरी, लोकगीत, राजस्थानी घूमर लोकगीत, काश्मिरी लोकनृत्य, मराठमोळी लावणी नृत्य, सादर केली. पोतराज लोकनृत्य प्रेक्षकांचे विशेष आकर्षण ठरले. या नृत्यांमध्ये शाळेतील सहशिक्षक प्रबोधकांत समुद्रे यांनी देखील विद्यार्थ्यासमवेत पोतराज साकार केला. मराठी, हिंदी, लोकगीत, गोंधळ, भारुड अशा विविध गीतावर नृत्य सादर करून महाराष्ट्राची संस्कृती व परंपरांचे दर्शन उपस्थित प्रेक्षकांना झाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रबोधकांत समुद्रे, सहाय्यक कल्याण आदमाने यांनी केले. कार्यक्रमच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षकांनी परिश्रम घेतले.

## दोन दिवसीय सहकार प्रशिक्षण वर्ग संपन्न

बीड । प्रतिनिधी

दिनांक ३. २ .२०२६ महाराष्ट्र राज्य सहकार संघ पुणेचे सहकार प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत सहकार प्रशिक्षण केंद्र लातूर जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था बीड यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक राजुरी वेस बीड या ठिकाणी शनिवार दिनांक ३१ १ २०२६ व रविवार दिनांक १. २. २०२६ या दोन दिवशीय सहकार प्रशिक्षणसाठी बीड तालुक्यातील नागरी पगारदार, सेवक, कर्मचारी ,पतसंस्थांना संचालक, कर्मचारी प्रशिक्षण वर्ग घेण्यात आले या कार्यक्रमाचे उद्घाटन बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे मा.आर.व्ही.उबाळे साहेब यांच्या हस्ते सरस्वती पूजनाने करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बीड जिल्हा सहकार बोर्डाचे उपाध्यक्ष मा. सुहास पाटील साहेब हे होते प्रमुख पाहुणे म्हणून बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे , मा. के.युव. आघाव साहेब, मा. एस पी. राठोड साहेब लोकशाही पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष माननीय भागवत वैद्यसाहेब झुंजार नेताचे उपसंपादक आत्माराम वावळ साहेब सेवानिवृत्त मुख्याध्यापक सर्जेराव मोराळे सर, सेवानिवृत्त मुख्याध्यापक तुकाराम आंधळे सर, ए. एस. कदम साहेब सेवानिवृत्त उपनिबंधक सहकारी संस्था नांदेड, ॲड. हनुमंत कांबळे साहेब सेवानिवृत्त सहाय्यक निबंधक सहकारी संस्था बीड प्रसिद्ध उद्योजक मा.संतोषरावजी निकाळजे साहेब तसेच लोकशाही पत्रकार संघाच्या राष्ट्रीय अध्यक्षा सुनंदाताई केदार मॅडम, बीड जिल्हा संघटक मा.संजय कुलकर्णी साहेब माननीय बोरखेडे साहेब प्रमाणित रेखापरीक्षक बीड माननीय चव्हाण साहेब प्रमाणे तलेखा परीक्षक बीड माननीय सातपुते साहेब प्रमाणित लेखापरीक्षक सहकारी संस्था बीड इत्यादी मान्यवर पहिल्या दिवशीच्या सत्राच्या प्रसंगी उपस्थित होते या दोन दिवशीय प्रशिक्षण वर्गात पहिल्या दिवशी माननीय श्री एन एन कुलकर्णी साहेब वसुली अधिकारी सोलापूर व दुसऱ्या दिवशी माननीय श्री खोडसे साहेब प्रमाणित लेखापरीक्षक सहकारी संस्था बीड तसेच या प्रशिक्षण वर्गाचे संयोजक सहकार प्रशिक्षण केंद्र लातूरचे उपप्राचार्य मा.कोळे साहेब यांनी देखील वसुली संदर्भात चांगले मार्गदर्शन केले तर दुसऱ्या दिवशी समारोप समारंभाच्या अध्यक्षस्थानी सावता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष मा.कल्याणराव आखाडे हे होते या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून मराठवाडा शिक्षक संघाचे सरचिटणीस मा. राजकुमार कदम सर, मा. डी तांदळे सर मार्गदर्शक मराठवाडा शिक्षक संघ, मा. भारत मोराळे सर व दैनिक मराठवाडा साथीचे जिल्हा प्रतिनिधी दैनिक मराठवाडा साथीचे जिल्हा प्रतिनिधी मा.संदीप बेद्रे साहेब इत्यादी मान्यवर उपस्थित होते सदरील कार्यक्रम प्रसंगी उपस्थितांचे स्वागत बीड जिल्हा सहकार बोर्डाचे संचालक प्राध्यापक बबनराव आंधळे सर यांनी केले व नंतर सर्व प्रशिक्षणार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले शेवटी कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन सहकार प्रशिक्षण केंद्र लातूरचे उपप्राचार्य मा. एस आर कोळे साहेब यांनी मानले व कार्यक्रमाची सांगता झाली

## राजमाता जिजाऊ महाविद्यालयामध्ये गणित व आंतरविद्याशाखीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन

किल्लेधारुर । प्रतिनिधी

येथील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे राजमाता जिजाऊ महाविद्यालयामध्ये वन डे नॅशनल वर्कशॉप ऑन आर्टिफिशियल इंटेलिजन्स इन इंडिया एज्युकेशन या विषयावरील गणित विभागाची राष्ट्रीय कार्यशाळा व व्हिजन ऑफ इंडिया २०४७ : रोड ऑफ हुमानिटी, सायन्स अँड कॉमर्स या विषयावरील आंतरविद्याशाखीय परिषदांचे आयोजन ६ फेब्रुवारी रोजी करण्यात आले आहे. या परिषदेचे उद्घाटन डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे प्र. कुलगुरू डॉ. वाल्मीक सरवदे यांच्या हस्ते उद्घाटन होणार आहे. या परिषदेचे बीजभाषण मलेशिया येथील डॉ. अनुराग श्रीवास्तव हे करणार आहेत. या समारंभाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालय विकास समितीचे कार्यकारी सदस्य श्री. जयसिंग भैय्या सोळंके हे असणार आहेत. प्रमुख उपस्थिती म्हणून महाविद्यालय विकासा समितीचे सदस्य श्री. लोभाजी चव्हाण, श्री. अजयसिंह दिख्खत, महाविद्यालय विकास समितीचे निमंत्रित सदस्य डॉ. राम शिनगारे, श्री. इं. ना. जाधव, डॉ. टी. जी. ठाणगे, प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे यांचे प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. या परिषदेच्या निमित्ताने अभ्यासक व संशोधकांकडून २५० पेक्षा अधिक प्राप्त झालेल्या शोधनिबंधांचे आंतरराष्ट्रीय दर्जाच्या जर्नल मध्ये प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते होणार आहे. या परिषदेमध्ये सादर होणाऱ्या शोधनिबंधांतून दर्जेदार शोध निबंधास प्रथम तीन क्रमांकांची पारितोषिके देण्यात येणार आहेत. या राष्ट्रीय परिषदांसाठी गणित व आंतरविद्याशाखीय विषयांच्या संशोधक, अभ्यासक व आवड असणाऱ्या माजी विद्यार्थी व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे, परिषदेचे सचिव उपप्राचार्य प्रा. महादेव जोगडे (गणित), आयक्यूएसी समन्वयक डॉ. एल. बी. जाधवर (आंतरविद्याशाखीय), डॉ. अनंथा गाडे (गणित), प्रोफेसर डॉ. अशोक लाखे (विज्ञान), प्रोफेसर डॉ. बालाजी नवले (कला), डॉ. विजयकुमार कुंभारे (वाणिज्य) यांनी केले आहे.

## तब्बल २५ वर्षानंतर भरली माजी विद्यार्थ्यांच्या स्नेह मिलनाची शाळा

बीड । प्रतिनिधी

काळ बदलला, चेहरा बदलला, नाही बदलली नाती. स्नेह मिलनाच्या सोहळ्यात, झाली पुन्हा गोड मैत्री. अशाच आठवणींचे, गाठोडी साठवत राहु. आयुष्याच्या वाटेवर, एकत्र चालत राहु. या उक्तीप्रमाणे गेवराई तालुक्यातील जातेगाव येथील यमादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या सन २०००-२००१ या वर्षातील इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांचा तब्बल २५ वर्षानंतर स्नहेमिलन सोहळ्याचा कार्यक्रम अतिशय आनंददायी आणि खेळीमेळीच्या वातावरणामध्ये शाळेच्या मैदानावर दि.१ फेब्रुवारी रविवार रोजी संपन्न झाला. शाळेच्या प्रांगणात संपन्न झालेल्या कार्यक्रमाची सुरूवात मान्यवरांच्या हस्ते दिपप्रज्वलन व सरस्वती पूजनाने झाली. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून शाळेचे माजी प्राचार्य भास्कर घाडगे लाभले तर प्रमुख उपस्थिती म्हणून लोणावळा विद्यालयाचे प्राचार्य व्ही.पी. पवार, विष्णु सायंबर, चंद्रकांत चव्हाण, महादेव गिरे, जाधव सर या मातंबर



शिक्षकांसह विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचा प्रारंभ राष्ट्रगीताने झाला. कार्यक्रमाची सुरूवात सकाळी १० वाजता करण्यात आली. यावेळी विविध भागातून विविध क्षेत्रात काम करणारे माजी विद्यार्थी विद्यार्थिनींनी मोठ्या संख्येने हजेरी लावली होती. संपूर्ण शाळेचे प्रांगण हे आनंदाने ओसांडून वाहत असल्याचे दिसून येत होते. कार्यक्रमाच्या प्रसंगी प्रत्येक विद्यार्थ्यांनी ओळख पुन्हा एकदा सर्वांना करून दिली. आपण काय करतो याबाबतही मनमोकळ्या पनाने सर्वांसमोर आपले मत मांडले. विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून उद्धव लाड, ज्योती सोनवणे, उमा राऊत, संतोष पवार, लक्ष्मण काळे, नितीन पांढरे, संजय पवार, शिवाजी धोंडरे, विठ्ठल जाधव, परमेश्वर गोल्हर, सुनिल मिसाळ, आप्पासाहेब महानोर यांच्यासह अनेक विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी अध्यक्षीय भाषणामध्ये भास्कर घाडगे यांनी आपल्या मनोगात म्हटले, की विद्यार्थी मोठ्या उंचीवर गेला तर त्या शिक्षकाला नक्कीच आनंद होतो, आणि विद्यार्थी चुकला तर दुःखही होतो. शिक्षकाची भूमिकाही मातापिता समानच असते. तर विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षकांना एकदा तरी निमित्ताने का होईना पण भेटायला हवे. विचारायला हवे आमचे विद्यार्थी मोठे होवून आम्हाला जेव्हा भेटतात तेव्हा, आमचाही उर भरून आल्याशिवाय राहत नसल्याचे मत चंद्रकांत चव्हाण सर यांनी व्यक्त केले. तसेच विष्णु सायंबर, महादेव गिरे, जाधव सर यांनी विद्यार्थ्यांना यशस्वी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी सर्वच माजी शिक्षकांचे डोळे पानावलेले दिसून आले. यामुळे प्रत्येक विद्यार्थ्यांचेही कंठ दाटून आल्याचे दिसून आले. गाणी, गप्पा, गोष्टी झाल्यानंतर कार्यक्रमाच्या शेवटी एकत्रीतपणे सर्वांनी स्नेहभोजनाचा लाभ घेतला. प्रत्येक जण आपलीकने एकमेकांची विचारपुस करताना दिसून येत होता. यावेळी कार्यक्रमाचे सुत्रसंचालन रमेश पवार यांनी तर आभार दिनेश जोशी यांनी मानले.

श्रद्धांजली कार्यक्रम

कार्यक्रमाच्या सुरूवातीला महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्यासह शाळेतील स्वर्गीय शिक्षक व विद्यार्थी यांना सामूहिक श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.


### जाहीर प्रगटन

मा.श्री. एम. आर. सातव, ७वे दिवाणी न्यायाधीश व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात किरकोळ दिवाणी अर्ज क. ६६/२०२६

मार्फत.ॲड बी.एन.तावरे सरस्वती वि.निरंक

अर्जदार सरस्वती भ्र. राजाराम वळे वय ४६ वर्ष धंदा घरकाम रा. तिरुपती नगर, बीड ता. जि. बीड श्रीकृष्णा पि. राजाराम वळे वय २२ वर्ष ,धंदा शिक्षण रा. सदर ३.ऋतुजा पि.राजाराम वळे

वय २५ वर्षे, धंदा शिक्षण रा. सदर सुशिल भ्र. बाजीराव वळे, वय ७८ वर्ष,धंदाघरकाम, रा.आनंदवाडी ता. जि.बीड

विरुद्ध निरंक

गैरअर्जदार

प्रकरणः भारतीय वारसा कायदा १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी मयत राजाराम पि. बाजीराव वळे यांचे वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.मयत राजाराम पि बाजीराव वळे दि.२४/११/२०२५ रोजी जिल्हा रुग्णालय बीड येथे मयत झालेले आहे.अर्जदार क.१ ही मयताचे पत्नी असुन अर्जदार क्र.२ हा मयताचा मुलगा तर अर्जदार क्र.३ ही मयताची मुलगी आहे.व अर्जदार क्रं.४ ही मयताची आई आहे. अर्जदारांशिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत. अर्जदारांचे असेही म्हणणे आहे की, शासकीय व निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणुन सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरील अर्जदार हे सदरहु मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून तीस दिवसाच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु न्यायालय सदरहु अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु, मयत नामे राजाराम पि. बाजीराव वळे रा. तिरुपती नगर बीड ता.जि. बीड यांचे अर्जदार हेच मयताचे कायदेशिर वारस म्हणून घोषित करून अर्जदारास वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची सर्वांनी नोंद घ्यावी. पुढील तारीख ०६/०३/२०२६ आज दिनांक.०२/०२/२०२६ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**स्वाक्षरीत**
**कनिष्ठ लिपिक**
**आदेशावरून स्वाक्षरीत दिवाणी न्यायालय व स्तर, बीड**


## पान ६ वरुन...

### मंथन राज्यस्तरीय

परीक्षेच्या दिवशी गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली.परीक्षेसाठी आलेल्या अनेक विद्यार्थ्यांना वर्ग खोल्यांऐवजी शाळेच्या बाहेरील वरांड्यात बसवण्यात आले,काही विद्यार्थ्यांना डेस्कवर बसवले गेले तर काहींना थेट जमिनीवर बसून परीक्षा द्यावी लागली. राज्यस्तरीय परीक्षा असूनही विद्यार्थ्यांना अशा परिस्थितीत परीक्षा द्यावी लागल्याने एकाग्रतेवर परिणाम झाल्याचे पालकांनी सांगितले.या प्रकारामुळे विद्यार्थ्यांसोबत आलेल्या पालकांनी तीव्र संताप व्यक्त केला. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य घडवणाऱ्या परीक्षांमध्ये किमान सुविधा पुरवणे ही आयोजकांची जबाबदारी असताना, ती पूर्ण करण्यात आयोजक अपयशी ठरल्याचा आरोप पालकांनी केला आहे. लहान वयोगटातील विद्यार्थ्यांना असुविधाजनक परिस्थितीत बसवणे हे अमानवी असल्याची भावना पालकांनी व्यक्त केली.भविष्यात अशा परीक्षांचे आयोजन करताना विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसह बसण्याच्या सुविधांची योग्य व्यवस्था करावी या प्रकरणाची शिक्षण विभाग व परीक्षा आयोजकांनी चौकशी करून कारवाई करावी अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

### आपल्या मुलांना चांगले

संस्कार चांगले नसल्याने खूप मोठे अपराध घडत आहेत. त्यामुळे आपल्या लहान मुलांना जसे संस्कार द्यावे तसे ते घडत असतात. मन चांगलं असेल तर देव त्या ठिकाणी येऊन राहतो..सुंदर मनानेच देवाची भजन भक्ती करणार गरजेचे आहे.

भागवत कथा ही संसारी जीवनाची व्यथा दूर करणारी आहे. श्रवण केल्याने पारायण केल्याने आणि मनन केल्याने या कथेचे फळ मिळते. असेही अंजनाताई म्हणाल्या. या कथा श्रवणासाठी हजारो भाविक भक्त उपस्थित होते. कथा यशस्वी करण्यासाठी गावातील तरुण मंडळी परिश्रम घेत आहेत.

### नागझरीच्या कन्येचा

योगदान लाभले आहे. कौतुकाचा वर्षाव प्रांजलीच्या या यशाबद्दल केज तालुक्यातील राजकीय, सामाजिक आणि क्रीडा क्षेत्रातील मान्यवरांकडून तिचे अभिनंदन केले जात आहे. एका सरपंचाची कन्या जेव्हा खेळाच्या मैदानात राज्याचे नाव उंचावते, तेव्हा ते ग्रामीण भागातील इतर मुलींसाठी प्रेरणादायी ठरते, अशा भावना ग्रामस्थांनी व्यक्त केल्या आहेत.

प्रांजलीने मिळवलेले हे यश केवळ तिचे नसून संपूर्ण गावाचा सन्मान आहे. जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर ग्रामीण भागातील मुलेही राष्ट्रीय स्तरावर चमकू शकतात, हे तिने सिद्ध केले आहे. विजयी संघाचे आणि कु. प्रांजली मुद्रिका चंद्रसेन चौरे हिचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

### गटसचिव श्रीधरराव अंडील

माजी चेअरमन वसंत शिक्षक सहकारी संस्था,संजय आबा चव्हाण चेअरमन चोरंबा,बाबुराव भोसले माजी,सरपंच धुनकवाड,तडसकर साहेब लिपीक सा नि धारुर,गरसचिव श्रीकृष्ण चोले,आशोक रंदवे, विष्णु रंदवे, भारत जाधव केज, संतोष लोंढे केज,आर्जुन मुंडे, विष्णु पांचाळ, दिनेश गायकवाड, रमेश वाघमोडे, दत्ता मंदे, विष्णु शेरकर, रमेश वाघमोडे, नामदेव मोरे, विजयकुमार करपे,सुरेश गिलबिले, स्वामी साहेब यांच्यासह सहकार क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते त्यांनी सेवापुर्ती निमित्त गटसचिव श्रीधरराव अंडील यांना शुभेच्छा दिल्या.

### नामस्मरणाने जीवनाचे

अमृतवाणीतून स्रोतेगणांनी ऐकला व मंत्रमुग्ध झाले

यावेळी मोजे गंगनाथवाडी ता.बीड येथे अखंड हरिनाम सप्ताह मध्ये महापुराण कथा व हरिकीर्तन कार्यक्रमांमध्ये प्रथम कीर्तन रुपीपुष्प गुरुवर्य शांतीब्रह्म नवनाथ बाबा महाराज मठाधिपती श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी यांचे सुश्राव्य असे कीर्तन संपन्न झाले .यावेळी पंचक्रोशीतील टाळकरी माळकरी विणेकरी मृदंगाचार्य गायनाचार्य भाविक भक्तांच्या उपस्थितीमध्ये कीर्तन संपन्न झाले

### भारतीय बौद्ध महासभेच्या

संजिवनीताई धन्वे ,जिल्हा संस्कार सचिव शामभाऊ वाघमारे,यांनी मार्गदर्शन केले या कार्यक्रमाचे अध्यक्ष भारतीय बौद्ध महासभेचे ता अध्यक्ष डॉ भागवत साळवे हे होत तर या कार्यक्रमाचे प्रस्ताविक तालुका संस्कार उपाध्यक्ष गुलाब धाईजे यांनी केले तसेच या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन तालुका सरचिटणीस सिद्धार्थ वक्ते यांनी केले तर आभार बौद्धाचार्य वाघमारे नाना यांनी मानले या प्रसंगी महिला जिल्हा संस्कार सचिव आशाताई मोरे,भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हा संघटक शोभाताई भोजने, महिला तालुका सरचिटणीस कोमलताई डोंगरे, कोषाध्यक्ष अनुराधाताई साळवे,भगवान जाधव, सुर्यवंशी साहेब माजी जिल्हा संरक्षण उपाध्यक्ष गुलाब प्रधान उपस्तीत होते या कार्यक्रमासाठी भारतीय बौद्ध महासभेचे महिला जिल्हा अध्यक्षा कमलताई डोंगरे,व तालुका संघटीका पुष्पाताई जाधव यांनी भोजनदान दिले हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मोहन काकडे, बळीराम काकडे, बाबासाहेब घनघाव, नितिन डोंगरे, भगवान डोंगरे,डी पी वाघमारे,संभाजी धाईजे,विशाल साळवे ,सागर साळवे, सिद्धांत साळवे,राजेभाऊ साळवे,चंद्रकला साळवे,अतिंका गायकवाड,कावेरी साळवे,वंदना साळवे,विजयमाला साळवे सह भारतीय बौद्ध महासभेचे ता पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले,

राज्य लोकतंत्र
शेत–शिवार
बुधवार दि.४ फेब्रुवारी २०२६
४

# बदलत्या हवामानामुळे हरभरा पीक विविध रोगांच्या विळख्यात

## उत्पादनात घट होण्याच्या भीतीने शेतकऱ्यांची चिंता वाढली

पुणे। प्रतिनिधी

रब्बीचे महत्वाचे पीक असलेल्या हरभरा पिकावर सध्या मर, करपा, भुरी, घाटेअळी अशा विविध रोगांचा मोठ्या प्रमाणावर प्रादूर्भाव झाल्याचे दिसत आहे. बदलत्या हवामानावा हा फटका असून खरीपापाठोपाठ रब्बी पिकेही हातची जातात की, काय, अशी चिंता शेतकऱ्यांना सतावत असून ते अडचणीत सापडले आहेत.

खरीप पिकांना यंदा अतिवृष्टीचा मोठा फटका बसला. अनेक शेतकऱ्यांची शेती पिकांसह खरडून गेली. या दुःखातून कसेबसे सावरत शेतकऱ्यांनी रब्बी पिकांची लागवड केलेली आहे. किमान यातून तरी थोडे नुकसान भरुन निघेल, अशी शेतकऱ्यांना आशा आहे. खरीप पिकांमध्ये यंदा तालुक्यात २५ हजार हेक्टरवर हरभरा पिकाची लागवड करण्यात आलेली आहे. यात चांगला दर मिळणाऱ्या डॉलर हरभऱ्याचे प्रमाण मोठे आहे. सध्या हे पिक फुलोऱ्यासह घाट्यात असताना कधी थंडी तर कधी ढगाळ वातावरण, तर कधी अचानक वाढलेली आर्द्रता अशा बदलत्या हवामानाचा या पिकावर विपरीत परिणाम झाला आहे. हरभरा पिकावर मोठ्या प्रमाणावर मर, करपा, भुरी तसेच घाटे पोखरणाऱ्या घाटेअळीचा प्रादुर्भाव वाढलेला आहे. तर काही भागांत हरभरा पिवळा पडून वाळत असल्याने शेतकरी प्रचंड धास्तावले आहेत. फुलोरा व घाटे धरण्याच्या महत्त्वाच्या अवस्थेतच या रोगांचा प्रादुर्भाव झाल्याने उत्पादनात मोठ्या प्रमाणावर घट होण्याची भीती शेतकरी व्यक्त करत आहेत. भराडी परिसरातील अनेक शेतकऱ्यांनी रोग नियंत्रणासाठी हजारो रुपये खर्च करून औषध फवारणी केली, मात्र सतत बदलणाऱ्या हवामानामुळे अपेक्षित परिणाम मिळत नसल्याची तक्रार आहे.खत, बियाणे व मजुरीचा खर्च आधीच वाढलेला असताना औषध फवारणीचा अतिरिक्त खर्च शेतकऱ्यांच्या आर्थिक अडचणी वाढवत आहे. कृषी विभागाकडून वेळेवर तांत्रिक मार्गदर्शन व योग्य औषधांची माहिती न मिळाल्यास नुकसान आणखी वाढू शकते, अशी भीती शेतकऱ्यांतून व्यक्त होताना दिसत आहे.



## कमीत कमी आहारात जास्त दूध देणारी राठी गाय! जाणून घ्या वैशिष्ट्ये



भारतामध्ये पशुपालन व्यवसाय मोठ्या प्रमाणात केला जातो. आपल्याला सगळ्यांना माहिती आहे की पशुपालन व्यवसायात दूध उत्पादन हे आर्थिक उत्पन्नाचे प्रमुख साधन आहे. पशुपालनामध्ये गाई मोठ्या प्रमाणात पाळल्या जातात. गाईंच्या अनेक प्रकारच्या जाती भारतात आहेत. त्यापैकी काही देशी तर काही संकरित प्रकारच्या आहेत. प्रत्येक जातीचे वेगवेगळे वैशिष्ट्य असून दूध देण्याची क्षमता देखील वेगवेगळे आहे. जी कमीत कमी आहारात सुद्धा सर्वाधिक दूध देण्यासाठी ओळखली जाते, त्या गाईला राठी असे म्हणतात.

कमीत कमी आहारात जास्त दूध : अनेक प्रकारच्या जाती गाईंच्या आहेत परंतु यामध्ये राठी गाय आहे ही एक फार महत्त्वपूर्ण आणि फायदेशीर जात आहे. सर्वाधिक दूध देणारी गाय म्हणून तिला सगळीकडे ओळखले जाते. या जातीच्या गाई मुख्यत्वेकरून राजस्थानच्या बिकानेर पासून ते पंजाब राज्याच्या सीमेपर्यंतच्या प्रदेशात आढळतात. याच गाईंना राजस्थानमध्ये कामधेनु असे देखील म्हटले जाते. या गाईच्या गुणधर्मांचा विचार केला तर साहिवाल जातीच्या गायीशी मिळते जुळते या गायीचे गुणधर्म आहेत. इतर जातींच्या गाई पेक्षा दूध देण्याची क्षमता जास्त असते. जर वातावरण पोषक असेल तर पशुपालक या गाईपासून जास्त दुधाचे उत्पन्न मिळवू शकतात. अगदी कमीत कमी आहारात जास्तीत जास्त दूध देण्याची क्षमता या गाई मध्ये आहे. राठी गाईचे दूध देण्याची क्षमता प्रति वेताला १०६२ ते २८१० दहा लिटर असते. जर आपल्याला गाईची निवड करण्याची कसब असेल तर आपण अधिक दूध उत्पादन करू शकता. प्रतिदिन या गाई आठ ते दहा लिटर दूध देत असतात. परंतु आपण जर समतोल आणि पौष्टिक आहार या गायींना खायला दिला तर २५ ते ३० लिटरपर्यंत क्षमता दूध देण्याची या गाईंची आहे.

राठी गायीचे वैशिष्ट्ये : या गाई दिसायला आकर्षक असून चेहरा रूंद असतो तसेच या गाईंचा आकार मध्यम स्वरुपाचा असतो. गाईच्या अंगावर पांढरे ठिपके असतात. तसेच शिंगे मध्यम आकाराचे असून मागे वळलेली असतात.शेपटी लांब असून वय झालेल्या गाईंचे वजन हे साधारण २८० ते ३०० किलोग्रॅम असते. या गाईंच्या सगळ्यात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे या कोणत्याही वातावरणात आणि परिसरात राहू शकतात.

## फेब्रुवारी महिन्यात अशी घ्या पिकांची काळजी

एकीकडे फेब्रुवारी महिना भाजीपाला पेरणीसाठी चांगला मानला जातो, तर दुसरीकडे फेब्रुवारी महिन्यात वातावरणातील बदलामुळे अनेक रोग व किडींचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता वाढते. अशा परिस्थितीत भारतीय कृषी संशोधन संस्थेच्या शास्त्रज्ञांनी शेतकऱ्यांना रोग आणि किडींच्या धोक्यापासून पिके वाचवण्यासाठी आवश्यक सल्ला दिला आहे.

हवामानातील बदलाचा परिणाम पिकांच्या उत्पादनावर होऊ शकतो, असे कृषी शास्त्रज्ञांचे म्हणणे आहे.

अशा स्थितीत पिकांवर रोग व किडींचा प्रादुर्भाव होऊन उत्पादन क्षमता कमी होऊ शकते, त्यामुळे पिकांवर विशेष लक्ष देणे आवश्यक आहे. ज्या भागात येत्या काळात पावसाची शक्यता आहे , त्यामुळे अशा परिस्थितीत ज्या शेतकऱ्यांची पिके शेतात उभी आहेत, त्यांनी कोणत्याही प्रकारे फवारणी करू नये, असे शास्त्रज्ञांचे म्हणणे आहे. तसेच सिंचन करू नये.

गव्हातील गंज रोगाचा धोका : या हंगामात गहू पिकावर पिवळ्या गंज रोगाचा धोका असतो. अशा परिस्थितीत पिकावर विशेष लक्ष ठेवावे, तसेच पिवळा गंज रोग आढळल्यास डायथेन एम-४५ २.५ ग्रॅम प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

हरभऱ्यातील शेंगा पोखरणाऱ्या किडीचा धोका : त्याचबरोबर या हंगामात हरभरा पिकावर शेंगा पोखरणाऱ्या किडीचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता आहे. या किडींपासून संरक्षण करण्यासाठी, ज्या शेतात ४०-४५% फुले आली आहेत अशा शेतात प्रति एकर ३-४ फेरोमोन सापळे लावा. याशिवाय शेतात वेगवेगळ्या ठिकाणी 'टी' आकाराचे प्रति एकर २० पक्षी थांबे शेतात लावावेत.

पेरणी सल्ला : शास्त्रज्ञांनी सल्ला दिला आहे की शेतकरी या दिवसात भेंडीची लवकर पेरणी करू शकतात. -४, परबनी क्रांती, अर्का अनामिका इत्यादी जाती स्त्रीच्या बोटाच्या लवकर पेरणीसाठी सर्वोत्तम आहेत. त्यांच्या पेरणीसाठी देशी खत टाकून शेत तयार करा. त्याचबरोबर भोपळा, मिरची , टोमॅटो, वांगी इत्यादींची पेरणी करता येईल, असा सल्लाही शेतकऱ्यांना देण्यात आला आहे.



## उन्हाळी कोथिंबीर लागवड

कोथिंबीरीची लागवड भारतातील बहुतेक सर्व राज्यात केली जाते. कोथिंबीरीच्या विशिष्ट स्वादयुक्त पानांसाठी कोथिंबीरीला वर्षभर मागणी असते. मात्र कोथिंबीरीची लागवड प्रामुख्याने खरीप आणि रब्बी हंगामात केली जाते. उन्हाळी हंगामात कोथिंबीरीचे उत्पादन कमी असले तरी मागणी मात्र भरपूर असते. त्यामुळे कोथिंबीरीच्या लागवडीस चांगला वाव आहे. कोथिंबीर ही रोजच्या आहारात वापरली जाणारी महत्वाची पालेभाजी आहे. कोथिंबीरीच्या विशिष्ठ स्वादयुक्त पानावर इतर भाज्यांचा स्वाद वाढविण्यासाठी शाकाहारी तरी मांसाहारी पदार्थामध्ये कोथिंबीरीचा वापर करण्यात येतो. कोथिंबीरीच्या वडया चटणी आणि कोशिंबीर लोकप्रिय आहे.

हवामान आणि जमीन : कोथिंबीरीची लागवड कोणत्याही प्रकारच्या हवामानात करता येते त्यामुळे अतिपावसाचा प्रदेश वगळता महाराष्ट्रातील हवामानात वर्षभर कोथिंबीरीची लागवड करता येते. उन्हाळयात तापमान ३६ अंश सेल्सिअसच्या वर गेल्यास कोथिंबीरीची वाढ कमी होते. कोथिंबीरीच्या पिकासाठी मध्यम कसदार आणि मध्यम खोलीची जमिन निवडावी. सेंद्रिय खते भरपूर प्रमाणात असल्यास हलक्या किंवा भारी जमिनीत कोथिंबीरीचे पिक चांगले येते. सुधारीत जाती : नंबर ६५ टी ५३६५ एनपीजे १६ व्ही १ व्ही २ आणि को-१, डी-९२ डी-९४ जे २१४ के ४५ या कोथिंबीरीच्या स्थानिक आणि सुधारित जाती आहेत.लागवडीचा हंगाम : कोथिंबीरीची खरीप, रब्बी आणि उन्हाळी अश तीनही हंगामात लागवड करतात. उन्हाळी हंगामात एप्रिल ते मे महिन्यात कोथिंबीरीचे उत्पादन घ्यावे.



लागवड पध्दती : कोथिंबीरीच्या लागवडीसाठी शेत उभे-आडवे नांगरुन चांगले भुसभुशीत करून ३२ मिटर आकाराचे सपाट वाफे बांधून घ्यावे. प्रत्येक वाफयात ८ ते १० किलो चांगली कुजलेली शेणखत टाकून मिसळून घ्यावे. वाफे सपाट करुन बी सारखे पडेल या बेताने फेकून पेरावे. बी खत मातीने झाकून हलके पाणी द्यावे. तणांचा प्रार्दुभाव जास्त प्रमाणात होत असल्यास सपाट वाफयांमध्ये १५ ते २० सेमी अंतरावर खुरप्याने उथळ ओळी पाडून बी पेरावे आणि नंतर मातीने झाकून घ्यावे. उन्हाळी हंगामात पेरणीपुर्वी वाफे चांगले भिजवून घ्यावे. आणि वाफसा आल्यावर बियाणे पेरावे. कोथिंबीरीच्या लागवडीसाठी हेक्टरी ६० ते ८० किलो बी लागते. पेरणीपूर्वी बियाण्यांवर चांगली उगवण होण्यासाठी प्रक्रिया करणे आवश्यक आहे. पेरणीपूर्वी धने फोडून बिया वेगळया कराव्यात यासाठी धने चपलेने अथवा लाकडी फळीने रगडून बी वेगळे करावे. तसेच पेरणीपूर्वी धन्याचे बी १२ तास पाण्यात उबदार जागी ठेवावे आणि नंतर लागवडीसाठी वापरावे. त्यामुळे उगवण १५ ते २० दिवसा ऐवजी ८ ते १० दिवसात होवून कोथिंबीरीच्या उत्पादनात वाढ होते आणि काढणी लवकर होण्यास मदत होते.

खते आणि पाणी व्यवस्थापन : कोथिंबीरीच्या पिकाच्या चांगल्या आणि जोमदार वाढीसाठी बी पेरताना हेक्टरी ३५ ते ४० गाडया शेणखत जमिनीत मिसळून द्यावे. कोथिंबीरीच्या पिकाला पेरणीच्या वेळी ५० किलो १५-५-५ हे मिश्रखत द्यावे. बी उगवून आल्यावर २०-२५ दिवसांनी हेक्टरी ४० किलो नत्र द्यावे. कोथिंबीरीचा खोडवा घ्यावयाचा असल्यास कापणीनंतर हेक्टरी ४० किलो नत्र द्यावे. कोथिंबीरीला नियमित पाणी देणे आवश्यक आहे. सुरूवातीच्या काळात बियांची उगवण होण्यापूर्वी वाफयाला पाणी देताना वाफयाच्या कडेने वाळलेले गवत किंवा उसाचे पाचट लावावे.

काढणी उत्पादन आणि विक्री : पेरणीपासून दोन महिन्यांनी कोथिंबीरीला फुले येण्यास सुरुवात होते. म्हणून त्यापूर्वी हिरवीगार आणि कोवळी लुसलुशीत असतानां कोथिंबीरीची काढणी करावी. साधारणपणे १५ ते २० सेमी उंच वाढलेली परंतु फुले येण्यापूर्वी कोथिंबीर उपटून अथवा कापून काढणी करावी. नंतर कोथिंबीरीच्या जुडया बांधून गोणपाटात किंवा बांबूच्या टोपल्यांमध्ये व्यवस्थीत रचून बाजारात विक्रीसाठी पाठवावी. पावसाळी आणि हिवाळी हंगामात कोथिंबीरीचे हेक्टरी १० ते १५ टन उत्पादन मिळते तर उन्हाळी हंगामात ६ ते ८ टन उत्पादन मिळते.

किड व रोग : कोथिंबीरीवर फारसे रोग आणि किडी दिसून येत नाही.काही वेळा मर रोगाचा प्रार्दूभाव होतो. भुरी रोगाच्या नियंत्रणासाठी लांम सी एस-६ सारख्या भुरी प्रतिबंधक जातीचा वापर करावा. आणि पाण्यात विरघळणारे गंधक वापरावे.




### महत्वाच्या घटना

१२९४ : अल्लाउद्दीन खिलजीने देवगिरी किल्ला सर केला आणि देवगिरीच्या यादव साम्राज्याचा अस्त झाला.
१६७० : सिंहगड ताब्यात मिळवण्यासाठी नरवीर तानाजी मालुसरे यांनी प्राणाची आहुती दिली.
१७६६ : माधवराव पेशवे आणि हैदराबदचा निजाम यांची कुरुमखेड येथे भेट
१९१९ : चार्ली चॅप्लिनने इतर तीन जणांबरोबर युनायटेड आर्टिस्ट्स कंपनीची स्थापना केली.
१९२२ : रीडर्स डायजेस्टचा पहिला अंक प्रसिद्ध झाला.
१९४५ : दुसरे महायुद्ध जनरल डग्लस मॅकआर्थर मनिला येथे परतले.
१९४८ : गांधी हत्यानंतर स्वातंत्र्यवीर सावरकर यांना सुरक्षा-निर्बंधान्वये अटक झाली.
१९५२ : स्वतंत्र भारतात प्रथमच सार्वत्रिक निवडणुका झाल्या.
१९५३ : आजच्या दिवशी वॉल्ट डिज़्नी यांची पीटर पॅन मूवीचा प्रीमियर ची सुरुवात झाली.
१९५८ : ७,६०० पौंडाचा एक हायड्रोजन बॉम्ब अमेरिकेच्या वायुसेनेने टायबी बेटांजवळ हरवला. हा बॉम्ब अमेरिकेने कायमचे हरवलेल्या चार आण्विक हत्यारांपैकी एक आहे.
१९६१ : आजच्या दिवशी संडे ''टेलिग्राफ न्यूज'' चा पहिला अंक प्रकाशित झाला.
१९६२ : फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष चार्ल्स डी गॉल यांनी अल्जेरियाला स्वातंत्र्य द्यावे असे आवाहन केले.
१९७१ : आजच्या दिवशी अपोलो-१४ अंतरीक्ष यान चंद्रावर उतरून अंतराळवीर सुद्धा चंद्रावर उतरले.
१९९९ : नेल्सन मंडेला यांनी संसद मध्ये त्यांचे शेवटचे भाषण दिले आणि मे महिन्यात त्यांनी पदाचा त्याग केला.
२००३ : भारताने २००२ मध्ये सोडलेल्या पीएसएलव्ही सी-४ या हवामानविषयक उपग्रहाला अंतराळवीर कल्पना चावला यांचे नाव देण्यात आल्याची पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांची घोषणा.
२००४ : 'पुण्याची' स्वाती घाटे बुद्धिबळातील वूमन ग्रँडमास्टर झाली.
२००७ : सुनिता विल्यम्स हि अंतराळात जास्त वेळ राहणारी पहिली भारतीय महिला बनली.
२०१० : आजच्या दिवशी अभिनव बिंद्रा ने नेदरलँड्स आंतरराष्ट्रीय शुटींग चॅम्पियनशिप मध्ये ६०० पैकी ५९६ अंक मिळवून सुवर्ण पदक स्वतःच्या नावावर केले.
२०१६ : ला आजच्या दिवशी वित्त मंत्रालयाने युटूब चॅनेल सुरु केले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७८८ : युनायटेड किंग्डमचे पंतप्रधान रॉबर्ट पील यांचा जन्म.
१८४० : जॉन बॉईड डनलॉप वाहनांच्या रबरी धावांच्या आत हवा भरलेली नळी वापरण्याच्या तंत्राचा शोध लावणारे स्कॉटिश संशोधक (मृत्यू: २३ आक्टोबर १९२१)
१९०५ : अच्युतराव पटवर्धन स्वातंत्र्यसैनिक, ४२ च्या चळवळीतील अग्रणी नेते, भारतीय समाजवादी पक्षाचे एक संस्थापक, विचारवंत, तत्त्वचिंतक व सामाजिक कार्यकर्ते (मृत्यू: ५ ऑगस्ट १९९२)
१९१४ : शंकर गोपाळ तथा शं. गो. तुळपुळे प्राचीन मराठी भाषेचे गाढे व्यासंगी, संत वाङ्मयाचे अभ्यासक व संशोधक, पुणे विद्यापीठाच्या मराठी विभागाचे प्रमुख (मृत्यू: ३० ऑगस्ट १९९४)
१९१६ : भारतीय कवी जानकी वल्लभ शास्त्री यांचा जन्म.
१९१९ : देशाचे पहिले मुस्लीम विदेश मंत्री खुर्शीद आलम खान यांचा जन्म.
१९३३ : गिरीजा कीर लेखिका आणि कथाकथनकार
१९३६ : बाबा महाराज सातारकर कीर्तनकार
१९४९ : महाराष्ट्राच्या पहिल्या महिला निवडणूक आयुक्त नीला सत्यनारायण यांचा जन्म.
१९७६ : अभिषेक बच्चन अभिनेता
१९९० : ला भारतीय गोलंदाज भुवनेश्वर कुमार चा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९२० : आळंदी येथील वारकरी शिक्षणसंस्थेचे संस्थापक, कीर्तनकार, प्रवचनकार आणि लेखक विष्णू नरसिंह जोग यांनी समाधि घेतली. (जन्म: १४ सप्टेंबर १८६७)
१९२७ : हजरत इनायत खाँ हिन्दुस्थानी शास्त्रीय गायक (जन्म: ५ जुलै १८८२)
१९९९ : पद्मश्री पुरस्काराने सन्मानित प्रसिद्ध नर्तकी इंद्राणी रहमान यांचे निधन.
२००० : कालिंदी केसकर गायिका
२००३ : गणेश गद्रे ज्येष्ठ गांधीवादी विचारवंत व महात्मा गांधींच्या 'हरिजन' या मराठी अंकाचे संपादक
२००८ : महर्षी महेश योगी योग गुरू (जन्म: १२ जानेवारी १९१७)
२०१० : सुजित कुमार चित्रपट अभिनेता व निर्माता (जन्म: ७ फेब्रुवारी १९३४)

## घराच्या घरी तयार करा जैविक कीट नियंत्रक

बदलत्या हवामानामुळे पिकांवर कीड आणि रोगांचा प्रादुर्भाव वाढताना पहायला मिळतो. थंडीच्या दिवसात विशेषतः विविध आळ्यांचा प्रादुर्भाव पिकांवर होतो. अशावेळी शेतकरी रासायनिक फवारणी करतात मात्र आज आपण जैविक पद्धतीने कीड नियंत्रण कशी करता येईल याची माहिती घेऊया (हा जैविक उपाय शेतकऱ्यांनी घाटेआळी , उंट आळी , पाने खाणारी आळी यांच्याकरिता सुरवातीच्या अवस्थेत किंवा कीड होऊच नये याकरिताही वापरू शकता ) हे जैविक किट नियंत्रक केवळ २ दिवसात आपल्याच शेतात/घरी तयार करता येणारे अत्यंत प्रभावी रामबाण कीट नियंत्रक आहे.

कृती : एका मोठ्या तांब्याच्या हंड्यात १० ते १५ लिटर देशी गायीचे गोमूत्र घ्या. त्यात खालील वनस्पतींचे पाले ठेचून टाका. कडुलिंब पाला अर्धा किलो रुइ (रुचकी/रुटी) पाला २५० ग्राम. सीताफळ पाला २५० ग्राम. धोतरा पाला २५० ग्राम. बेशरम पाला २५० ग्राम. लसूण २५० ग्राम. हिरवी मिरची २५० ग्राम. गावरान तंबाखू २५० ग्राम. गोमूत्रातील वरील मिश्रणावर झाकण ठेवून उकळण्यास ठेवावे. उकळून अर्धे झाल्यावर ४८ तास थंड करावे. त्यानंतर गाळून घेऊन प्लास्टिक पात्रात भरून ठेवावे.

फवारणी : कोणत्याही पिकावर दर आठवड्याला एका पंपाला ५० ते ७५ मिली टाकून फवारणी करावी.



राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत
बुधवार दि.४ फेब्रुवारी २०२६ ५



# क्षयरोगाच्या समुळ उच्चाटनासाठी समन्वयाने कामे करावीत - जिल्हाधिकारी

जालना प्रतिनिधी

टीबीमुक्त भारत हे स्वप्न साकार करण्यासाठी राष्ट्रीय क्षयरोग निर्मुलन कार्यक्रम राबविला जात आहे. जिल्ह्यात क्षयरुग्णांचे गेल्या वर्षीच्या तुलनेत प्रमाण कमी होवून मृत्यदरही घटला आहे. क्षयरोग हा संसर्गजन्य रोग आहे. क्षयरोग हा जीवाणूजन्य आजार असून तो योग्य औषधोपचाराने पुर्णपणे बरा होतो. तरी आरोग्य विभागाने अधिकाधिक जनजागृती करत क्षयरोगाच्या समुळ उच्चाटनासाठी समन्वयाने कामे करावीत, असे निर्देश जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी बैठकीत दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात राष्ट्रीय क्षयरोग दुरिकरण कार्यक्रमातंर्गत जिल्हास्तरीय टी.बी. फोरमची बैठक पार पडली. याप्रसंगी त्या बोलत होत्या. या बैठकीस जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ.गोपाल कुडलीकर, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.जयश्री भुसारे, क्षयरोग वैद्यकिय अधिकारी, सर्व तालुका आरोग्य अधिकारी, वरिष्ठ उपचार पर्यवेक्षक, प्रयोगशाळा पर्यवेक्षकांसह संबंधित यंत्रणेचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते. जिल्हाधिकारी आशिमा मित्तल म्हणाल्या की, जिल्ह्यातील सक्रीय क्षयरुग्णांचा संबंधित



विभागाकडून आढावा घेण्यात आला. यामध्ये निष्पन्न झालेल्या क्षयरुग्णांची एचआयव्ही व आरबीएस तपासणी वेळोवेळी करुन घ्यावी. दरवर्षी टीबी जीवाणुंचे संशोधन करणारे डॉ. रॉबर्ट कॉक यांच्या प्रित्यर्थ २४ मार्च रोजी जागतिक क्षयरोग दिन साजरा करण्यात येतो. तरी सर्व सामान्य जनतेमध्ये क्षयरोग आजाराबाबत जनजागृती करण्यासाठी क्षयरोग दिन कार्यक्रमाची मोठ्या प्रमाणात जनजागृती करावी, टीबीमुक्त ग्रामपंचायतीच्या १० सरपंच यांचा सन्मान जागतिक क्षयरोग दिनानिमित्त करुन त्यांना प्रोत्साहीत करावे. जिल्ह्यात केंद्रीय क्षयरोग विभागाने क्षयरुग्णांना सामुदायिक सहाय्य मिळवून देण्यासाठी क्षय रुग्णांसाठी केंद्र शासनाने प्रधानमंत्री टीबीमुक्त भारत उपक्रमांतर्गत निक्क्षय मित्र कम्युनिटी सपोर्ट टू टीबी पेशंट हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत समाजातील दानशुर व्यक्ती, स्वयंसेवी संस्था, उद्योग समुह इत्यादीच्या माध्यमातून मदत उपलब्ध करुन देण्यात येते. वर्ष २०२५ मध्ये एकुण ९४० कोरडा पोषण आहार किटचे क्षयरुग्णांना वाटप करण्यात आला. यामध्ये कलश सिडस ६५०, मार्केट कमिटी जालना २०० आणि गजलक्ष्मी स्टील जालना ९० याचा समावेश आहे. वर्ष २०२६ मध्ये एकुण क्षय रुग्णांचे उद्दीष्ट २२५० असून याकरीता पुढील सहा महिन्यासाठी साधारणत: १३५०० कोरडा पोषण आहार किटची आवश्यकता आहे. तरी जिल्ह्यातील दानशुर व्यक्ती, संस्थांनी पुढाकार घेवून आपले योगदान द्यावे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. जालना जिल्ह्यात १ जुलै ते ३१ डिसेंबर २०२५ या कालावधीत टीबीमुक्त भारत अभियान राबविण्यात आले. यामध्ये सर्व तालुक्यामध्ये ३ लाख ९७ हजार २१६ नागरिकांची तपासणी करण्यात आली. स्वस्थ नारी सशक्त परिवार अभियान दि.१७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत राबविण्यात आले. यामध्ये विविध आरोग्य संस्थेत आरोग्य शिबिराचे आयोजन करुन अतिजोखीमग्रस्त भागातील ४७ हजार ४३६ महिलांची क्षयरोग विषयक आरोग्य तपासणी करण्यात आली. यातून ७७ रुग्ण पॉझिटीव्ह आढळून आले आहेत. जिल्हाभरात वर्ष २०२५ मध्ये क्षयरुग्णांमध्ये तंबाखुचे सेवन करणारे ५५ रुग्ण, धुम्रपान करणारे २५ रुग्ण आहेत. क्षयरोगमुक्त ग्रामपंचायत अभियान जालना जिल्ह्यातील सर्व तालुक्यात राबविण्यात आले यात एकुण ७७८ ग्रामपंचायतीचा समावेश आहे. तर वर्ष २०२४ मध्ये एकुण ३३१ ग्रामपंचायती टीबीमुक्त म्हणून पात्र ठरल्या होत्या. तर वर्ष २०२५ मध्ये ५६६ ग्रामपंचायती टीबीमुक्त ग्रामपंचायती म्हणून पात्र ठरल्या आहेत. जानेवारी ते जुन २०२५ अखेरपर्यंत १०२८ क्षयरुग्ण उपचारावर आले त्यापैकी ९६८ रुग्णांची एचआयव्ही तपासणी करण्यात आली, यापैकी २० क्षयरुग्णांना एचआयव्ही असल्याचे निदान झाले असून या रुग्णांना सीपीटी व एआरटी सुरु करण्यात आली आहे. जालना शहर महानगरपालिकेअंतर्गत एकुण २९ क्षयरुग्ण उपचार घेत आहेत. अशी माहिती जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ.गोपाल कुडलीकर यांनी संगणकीय सादरीकरणाद्वारे उपलब्ध करुन दिली.

## अहिल्यानगर महापालिकेत पक्षांतर्गत सव्वा-सव्वा वर्षाचा फॉर्म्युला



अहिल्यानगर / प्रतिनिधी

महापालिकेच्या महापौर व उपमहापौर पदासाठी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी, भाजप व राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) युतीने सत्तेचा स्पष्ट फॉर्म्युला जाहीर केला. शहरात झालेल्या नगरसेवकांच्या बैठकीत, महापौरपद राष्ट्रवादी काँग्रेसकडे तर उपमहापौरपद भाजपकडे देण्याचा निर्णय जाहीर करण्यात आला. इच्छुकांची संख्या लक्षात घेता अडीच वर्षांचा कार्यकाळात महापौर व उपमहापौर ही पदे पक्षांतर्गत सव्वा-सव्वा वर्ष वाटून दिली जाणार असल्याचे स्पष्ट केले.

नामांतरानंतरचा अहिल्यानगरचा पहिला महापौर होण्याचा मान राष्ट्रवादीच्या ज्योती गाडे तर, उपमहापौरपदाचा मान भाजपचे धनजंय जाधव यांना मिळाला आहे. त्यांचे प्रत्येकी एक-एक अर्ज दाखल झाल्याने ६ फेब्रुवारी होणार्या विशेष निवड सभेत त्यांच्या नावाची केवळ औपचारिक घोषणाच बाकी राहिली आहे. सोमवारी युतीची बैठक पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या उपस्थितीत पार पडली. यावेळी आमदार संग्राम जगताप, माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील व पक्षाचे पदाधिकारी, नगरसेवक उपस्थित होते. महापौरपदी प्रभाग क्रमांक तीन मधील नगरसेविका ज्योती अमोल गाडे, तर उपमहापौरपदी भाजपचे प्रभाग क्रमांक पाच मधील नगरसेवक धनंजय जाधव यांचे नाव निश्चित करण्यात आले.

या दोन्ही नावांची घोषणा पालकमंत्री विखे यांनी बैठकीत केली. बैठकीनंतर पत्रकारांशी बोलताना मंत्री विखे पाटील, आ.जगताप व डॉ. विखे यांनी युतीचा अधिकृत निर्णय जाहीर केला. महापौर व उपमहापौर ही पदे पक्षांतर्गत सव्वा-सव्वा वर्ष वाटून दिली जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. दरम्यान, स्थायी समिती सभापती, महिला व बालकल्याण समितीचे सभापती व उपसभापती, सभागृह नेता, तसेच स्थायी व महिला-बालकल्याण समित्यांच्या सदस्य, स्वीकृत नगरसेवक नियुक्तीबाबत अंतिम निर्णय आ. जगताप व डॉ. विखे संयुक्तपणे घेणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

## परीक्षेत कॉपी करण्यास सहकार्य करणाऱ्यावर गुन्हा दाखल करुन सेवेतून निलंबित करणार -आशिमा मित्तल

जालना प्रतिनिधी

जिल्ह्यात माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (बारावी) दि.१० फेब्रुवारी ते दि.१८ मार्च २०२६ तर माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (दहावी) दि.२० फेब्रुवारी ते दि.१८ मार्च २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आली आहे. जिल्ह्यात कॉपीमुक्त अभियान प्रभावीपणे राबविण्यात येणार असून दहावी, बारावीच्या परीक्षेत कॉपी करण्यास सहकार्य करणाऱ्यावर गुन्हा दाखल करुन सेवेतून निलंबित केले जाईल, असे निर्देश जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी बैठकीत दिले.

जिल्ह्यात इयत्ता बारावीच्या परीक्षेसाठी ३७ हजार ३३८ विद्यार्थ्यांसाठी ७९ परीक्षा केंद्र आहेत. इयत्ता दहावीच्या परीक्षेसाठी ३२ हजार ४३३ विद्यार्थ्यांसाठी १०२ परीक्षा केंद्र आहेत. सर्व परीक्षा केंद्रावर सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची चोख व्यवस्था करण्यात आली असून जिल्ह्यातील संवेदनशील बारावीच्या ८ तर दहावीच्या ४ अशा एकुण १२ परीक्षा केंद्रावर ड्रोन कॅमेऱ्याची नजर राहणार असून चित्रीकरणही करण्यात येणार आहे. जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात दहावी, बारावीच्या परीक्षेच्या अनुषंगाने दक्षता समितीची बैठक पार पडली. यावेळी त्या बोलत होत्या. या बैठकीस उपजिल्हाधिकारी नम्रता चाटे, पोलिस उपअधिक्षक रविंद्र निकाळजे, शिक्षणाधिकारी बाळु खरात यांच्यासह शिक्षण विभागासह संबंधित यंत्रणेचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते. जिल्हाधिकारी आशिमा मित्तल म्हणाल्या की, विद्यार्थ्यांची क्षमता विकसित करण्यासाठी कॉपीला आळा घालणे अतिशय महत्वाचे आहे. दहावी, बारावीच्या परीक्षा शांततेत व तणावमुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी वातावरण निमिर्ती करुन विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्ता वाढ होण्यासाठी कॉपीमुक्त परीक्षा अत्यंत महत्वाची आहे. आगामी काळात परीक्षा पारदर्शक आणि शांततेत पार पाडण्याचा प्रशासनाचा मानस असून कॉपीमुक्त परीक्षा सुनिश्चित करण्यासाठी प्रशासनाकडून कडक उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत. दहावी व बारावीच्या परीक्षेत कॉपी करण्याचा प्रयत्न केल्यास संबंधित उमेदवारावर कठोर कारवाई करण्यात येईल. परीक्षार्थ्यांनी कोणत्याही प्रलोभनांना बळी पडू नये, आपल्या अभ्यासावरुन पेपरमध्ये लिखाण करावे. सर्व परीक्षा केंद्रावर २ अधिकारी-कर्मचाऱ्यांची बैठे पथकात नियुक्ती करण्यात येणार आहे. जिल्हाभरात परीक्षेसाठी एकुण ६ भरारी पथके तैनात करण्यात आली असून त्याद्वारे सर्व परीक्षा केंद्रावर लक्ष दिले जाणार आहे. त्यामुळे कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी केंद्र संचालकांनी दक्षता बाळगावी, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. केंद्र संचालकाशिवाय परीक्षा केंद्रावर कोणत्याही व्यक्तीला मोबाईलचा वापर करता येणार नाही. तसेच परीक्षा केंद्र परीसरात १४४ कलम लागू करण्यात येणार आहे. परीक्षार्थ्यांची तपासणी करुन नंतरच परीक्षा केंद्रात प्रवेश देण्यात येणार आहे. जालना जिल्ह्यातील दहावी, बारावीच्या एकुण १२ संवेदनशिल परीक्षा केंद्रासाठी वेगळ्या मार्गदर्शक सूचना देण्यात येणार असून त्यांच्यासाठी स्वतंत्र व्हॉटसअप ग्रुपही तयार करण्यात आला आहे. त्याद्वारे नियंत्रण ठेवण्यात येणार आहे. या सर्व दहावी, बारावीच्या परीक्षेत उत्कृष्ट कार्य करणाऱ्या टॉप टेन केंद्र प्रमुखांचा पालकमंत्री यांच्या हस्ते गौरव केला जाईल. असेही त्यांनी यावेळी सांगितले. यावेळी उपस्थित केंद्र प्रमुखांना माझ्या परीक्षा केंद्रावर कॉपीचा गैरप्रकार घडू देणार नाही अशी सामुहिक प्रतिज्ञा देण्यात आली. या बैठकीस जिल्ह्यातील सर्व गटशिक्षणाधिकारी, सर्व केंद्र संचालक आदि मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## स्व. अजित दादा दूरदृष्टी असणारे नेते होते-सुरेशकुमार जेथलिया

परतूर प्रतिनिधी

राज्याचे उपमुख्यमंत्री मा. ना.अजितदादा पवार यांच्या अपघाती निधन पश्चात परतूर मतदार संघात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने परतुर येथे स्व. अजित पवार यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी शोक सभेचे आयोजन करण्यात आले होते.येथील इंदिरा मंगल कार्यालयात संपन्न झालेल्या या शोकसभेला मा आ. सुरेशकुमार जेथलिया, शिवसेना शिंदे गटाचे जिल्हा प्रमुख ए जे बोराडे, राष्ट्रवादी शरद पवार गटाचे कपिल आकात, शिवसेना ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख महेश नळगे, काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष बाळासाहेब आकात, माधवराव कदम, सुदर्शन सोळंके, नितीन जेथलिया, बाबासाहेब गाडगे, दिलीप चव्हाण, इंद्रजित घनवट, बाबुराव हिवाळे, राजेश खडेलवाल, डॉ. सातोनकर, अखिल काजी, शाकेर खतीब, स. वसिम, अंकुशराव तेलगड, सिधार्थ बंड, रहेमुसेठ कुरेशी, मोईनसेठ कुरेशी, मंगेश डहाळे, संजय राऊत, ऋषिकेश कराळे,अयुब कुरेशी,मुरलीधर देशमुख, डॉ. प्रदीप चव्हाण,डॉ.प्रमोद जगताप, बद्रीनारायण खवणे, सिद्धू सोळंके, कृष्णा आरगडे, अशोक उबाळे, शिवाजीराव भोसले, गणेश कुलकर्णी, प्रा. पांडुरंग नवल, एकनाथ कदम, गौतम कोटेचा, महिला राष्ट्रवादी आघाडीच्या सौ.विश्रांती पट्ठे, खाडे, अर्चना राऊत, सिद्धू अंभुरेह मान्यवराची उपस्थिती होती. यावेळी श्रद्धांजलीपर शोक संदेश व्यक्त करताना, माजी आमदार सुरेशकुमार जेथलिया यांनी स्वर्गवासी अजित दादा यांच्या आठवणींना उजाळा देत एक कर्तबगार नेता व प्रशासनावर वचक असलेले सक्षम नेतृत्व या महाराष्ट्राने गमावले असल्याचे दुःख व्यक्त केले. अतिशय शिस्त प्रिय व दूरदृष्टीचे नेते म्हणून स्वर्गवासी अजित दादा पवार यांची ओळख असल्याचे सांगत त्यांच्या निधनाने खूप मोठी न भरून निघणारी पोकळी निर्माण झाली असल्याच्या भावना त्यांनी यावेळी व्यक्त केल्या. तर आपल्या प्रास्ताविकात नितीन जेथलिया म्हणाले की, स्वर्गवासी अजित दादा हे कार्यकर्त्यांशी निगडित असणारे नेते होते. जवळच्या कार्यकर्त्यांना नावानिशी आवाज देत हक्काने कामे करून देणारे नेते म्हणून त्यांचा परिचय होता. परतुर शहराच्या विकासासाठी अनेक निधी मंजूर करण्याबाबत स्वर्गवासी अजितदादा यांनी साकारात्मक भूमिका बजावली होती. त्यांची राज्याला खरी गरज असतानाच आपण सर्वजण त्यांना मुकलो हे दुःख न सहन होणारे असल्याच्या भावना त्यांनी व्यक्त केल्या. यावेळी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख ए जे बोराडे यांनी दादांच्या मुलाखतीचा अनुभव व्यक्त करत राजकीय खेळी मध्ये तत्पर असणारे दादा विरोधकांना देखील आपलेसे करत होते व त्यांचात कार्यकर्त्यांनाही ओळखण्याची धमक होती अशा भावना व्यक्त केल्या तर राष्ट्रवादीचे जिल्हा युवा प्रमुख कपिल आकात यांनी दादांच्या आठवणींचा उजाळा देत कामानिमित्त जेव्हा जेव्हा त्यांची भेट व्हायची तेव्हा आग्रहाने सन्मानाने वागणूक देत त्यांनी कामे मार्गी लावली असल्याची महिती दिली. तर शिवसेना उबाठा गटाचे जिल्हाप्रमुख महेश नळगे यांनी बेधडक व्यक्तिमत्व म्हणून स्वर्गवासी अजित दादा यांचा उल्लेख केला. प्रशासनासह पक्षात व कार्यकर्त्यात देखील त्यांचा आदरयुक दरारा होता अशा भावना व्यक्त करत राज्याच्या जडणघडण्यासाठी स्वर्गवासी अजितदादाचे मोठे योगदान असल्याचा भावना त्यांनी यावेळी व्यक्त केल्या. काँग्रेसचे बाळासाहेब आकात यांनी देखील दुग्ध व्यवसायासाठी दादांचे योगदान कश्याप्रकारे होते त्याबद्धल मत व्यक्त केले. सदरील कार्यक्रमाला सर्व पक्षांचे नगरसेवक, राजकीय पुढाऱ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. यावेळी सर्वांच्यावतीने त्यांच्या प्रतिमेला पुष्प वाहण्यात आले व दोन मिनिटे मौन पाळत श्रद्धांजली देण्यात आली. या शोकसभेचे सूत्रसंचालन पत्रकार अजय देसाई यांनी केले.

## महिलांच्या आरोग्यासाठी मेनोपॉज क्लिनिकचा उपक्रम

नांदेड

राज्य शासनाच्या आरोग्य सेवा संचालनालयाच्या सूचनेनुसार आणि जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संगीता देशमुख व जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय पेरके यांच्या मार्गदर्शनाखाली नांदेड जिल्ह्यात महिलांच्या आरोग्यासाठी एक अत्यंत महत्त्वाचा आणि स्तुत्य उपक्रम राबविण्यात येत आहे. वाढत्या वयानुसार महिलांमध्ये होणारे शारीरिक व मानसिक बदल लक्षात घेऊन, जिल्ह्यातील सर्व शासकीय रुग्णालयांमध्ये मेनोपॉज क्लिनिक (रजोनिवृत्ती क्लिनिक) सुरू करण्यात आले आहेत.

हा उपक्रम आता दर बुधवारी नियमितपणे राबविला जात आहे. नुकत्याच झालेल्या २८ जानेवारी रोजीच्या क्लिनिकमध्ये जिल्ह्यातील विविध २० केंद्रांवर महिलांची तपासणी करण्यात आली. प्रत्येक बुधवारी जिल्ह्यातील जिल्हा रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय आणि ग्रामीण रुग्णालयांमध्ये विशेष मेनोपॉज ओपीडी भरवण्यात येणार. स्त्रीरोग तज्ज्ञांमार्फत तपासणी, आवश्यक औषधोपचार आणि वैद्यकीय चाचण्यांची सुविधा. रजोनिवृत्तीच्या काळात महिलांना होणारा मानसिक त्रास आणि हार्मोनल बदलांवर मात करण्यासाठी विशेष समुपदेशन. संतुलित आहाराबद्दल आणि जीवनशैलीतील बदलांबाबत तज्ज्ञांकडून मार्गदर्शन, असे या उपक्रमाचे वैशिष्ट्ये आहे. जिल्ह्यातील एकूण २० आरोग्य संस्थांमधून या उपक्रमात देगलूर (३३), भोकर (१८), मुदखेड (१२) आणि मुखेड (११) एकूण १३२ महिलांची तपासणी करण्यात आली.

## पोलिस पुत्राच्या कुख्यात गँगचा निराला बाजार भागात राडा

छत्रपती संभाजीनगर

शहरातील गजबजलेल्या निराला बाजार परिसरात एका पानटपरी चालकाला पोलिस पुत्राच्या कुख्यात गँगने पिस्तूल आणि चाकूचा धाक दाखवून मारहाण करत लुटल्याची घटना समोर आली आहे. हा प्रकार सायंकाळी ५ ते ६ वाजेच्या सुमारास घडला. भरदिवसा घडलेल्या या प्रकारामुळे परिसरात खळबळ उडाली असून, गुन्हे शाखेने तिघांना बेड्या ठोकल्या आहे.

जय कन्हैय्या भांडारकर (२३, रा. मोदीखाना, जालना), रितेश पारस पहाडिया (२५, रा. कुंवारफल्ली, राजाबाजार) आणि करण गणेश तांदळे (२६, रा. कुंभारवाडा) अशी अटकेतील तर साहिल चांडक (२८, रा. औरंगपुरा) असे फरार आरोपीचे नाव असल्याची माहिती गुन्हे शाखेचे निरीक्षक गजानन कल्याणकर यांनी दिली. तिघांना ४ फेब्रुवारीपर्यंत न्यायालयाने पोलिस कोठडी सुनावली आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी आशिष रामेश्वर काष्ठे (२४, रा. चौरहा) यांची निराला बाजार येथील अशोका रेस्टॉरंटच्या बाजूला जयभवानी पान सेंटर नावाची टपरी आहे. आशिष आपल्या दुकानावर असताना त्यांच्या ओळखीचा आरोपी करण तांदळे हा जय भांडारकर आणि रितेश पहाडिया यांच्यासह मोपेडवरून (एमएच-२० जीजे १०५१) तेथे आला. करण तांदळे याने त्याचा मित्र साहिल चांडक याला फोन लावून आशिषशी बोलणे करून दिले. साहिलने फोनवरून आशिषला करणला ५ हजार रुपये आणि दुकानातील सिगारेट दे, अशी धमकी दिली. पैसे देण्यास नकार देताच तिथे आलेल्या गुंडांनी मारहाण करण्यास सुरूवात केली. ारहाण सुरू असतानाच करण तांदळे याने स्वतःकडील चाकू काढला, तर जय भांडारकर याने पिस्तूल काढून आशिषच्या पोटाला लावली. जर पैसे आणि सिगारेट दिली नाही तर तुला जिवंत मारून टाकू, अशी धमकी देऊन त्यांनी आशिषला बाजूला ढकलले. त्यानंतर आरोपींनी टपरीच्या गल्ल्यातील ७ हजार रुपयांची रोकड आणि ६ हजार रुपये किमतीचे सिगारेटची पाकिटे असा १३ हजारांचा मुद्देमाल घेऊन पसार झाले. जालना येथील कुख्यात गुन्हेगार जय भांडारकर हा पोलिस पुत्र असून, त्याच्याविरुद्ध दरोडा, लूटमार, जीवघेणा हल्ला यासह अनेक गंभीर १ स्वरूपाचे गुन्हे जालना येथे दाखल आहेत. भांडारकर आणि रितेश पहाडिया दोघांनी एप्रिल २०२४ रोजी पदमपुऱ्यात मध्यरात्री मैत्रिणीला कोणी त्रास दिला, असे म्हणत एका तरुणाच्या डोक्याला पिस्तूल लावले तर दुसऱ्याच्या गळ्याला चाकू लावून ठार मारण्याचा प्रयत्न केला होता. दोघे कुख्यात गुन्हेगार आहे.

**नगरपंचायत घनसावंगी जि जालना**
**प्रशासकीय इमारत, घनसावंगी**
**जा.क्र.२०२६/नपघ/जा.प्र./कावी-२७२३**
**दिनांक:- ०३/०२/२०२६**
**जाहीर प्रगटन**

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार हकीमा शेख मोहम्मद रशीद शेख रा.ता घनसावंगी जि. जालना यांनी नामे मौहम्मद रशीद मोहम्मद हादी शेख रा.ता. घनसावंगी जि. जालना मिळकत क्रं. १७१०/८ च्या नावे नोंद असनु वारसाआधारे नामांतर करणे बाबत आवक क्रं. ३१७७ दि.०३/०२/२०२६ अर्ज सादर केला आहे.

अर्जासोबत ०१. मोहम्मद रशीद मोहम्मद हादी शेख रा.ता. घनसावंगी जि. जालना यांचे मृत्युप्रमाणपत्र दि. १६/०१/२०२४ २. मा. विद्यामान दिवाणी न्यायधीश (क. स्तर) जालना यांचे वारस प्रमाणपत्र क्रं. CIVIL M.A NO. १५०/२०२४ दि. १६/१२/२०२४ ३. इतर वारस यांचे समंतीपत्र/शपथपत्र क्रं ५५८ दि. ०२/०२/२०२६ इत्यादी कागदपत्रे जोडली आहे. ज्याची चतु: सिमा खालील प्रमाणे आहे.

चतुःसिमा
पुर्व :- फजलखान आरेफखान पठाण यांची जागा
पश्चिम :- ०९ मीटर रस्ता
दक्षिण :- वामनराव दादासाहेब देशमुख यांची प्लॉटींग
उत्तर :- फजलखान आरेफखान पठाण यांची जागा

वरील चतुःसिमा मधील जागा वारसाआधारे नामांतर करणे बाबत कोणाचेही काही उजर/ आक्षेप/तक्रार असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन या कार्यालयात १५ दिवसाच्या आत लेखी कागदपत्राच्या पुराव्या सह आक्षेप अर्ज दाखल करावा. नसता नियमाने मुदत संपल्यावर नामांतर साठी कोणाचेही काहीही म्हणने नाही. असे समजुन नामांतर कार्यवाही पुर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

करीता जाहीर प्रगटन माझ्या सहीने व शिक्याने दिले आहे.

स्वाक्षरित
**मुख्याधिकारी**
**नगरपंचायत घनसांवगी**

**कार्यालय नगरपंचायत घनसावंगी जि जालना**
**प्रशासकीय इमारत, घनसावंगी**
npghansawangi@gmail.com
phone no 02483-271787
**जा.क्र.२०२६/नपघ/जा.प्र./कावी-२७२४**
**दिनांक:-०३/०२/२०२६**
**जाहीर प्रगटन**

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार भगवान दिनकरराव जोशी रा.ता.जि. औरंगाबाद यांनी नामे १. बाळकृष्ण दासराव भाकरे २. देवेन बाळकृष्ण भाकरे रा.ता.जि. औरंगाबाद यांच्याकडुन रजिस्टर दस्त क्रं १३५९ दि. २२/०४/२०२२ या खरेदीदस्ताची सत्य प्रत जोडुन आवक क्रं ३१७९ दिनांक:- ०३/०२/२०२६ रोजी नामांतर करण्यासाठी अर्ज सादर केला आहे. १. बाळकृष्ण दासराव भाकरे २. देवेन बाळकृष्ण भाकरे रा. ता. जि. औरंगाबाद नावावर असलेला गट नं (२३९) मधील प्लॉट नं. ४९ सि.स.नं. - ज्याचा मिळकत क्र. १५७४/४९ मधील क्षेत्र ७५.२९ चौ.मी नावे करणेस्तव ज्याची चतु: सिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्वेस :- प्लॉट नं. ५०
पश्चिमेस ९ मीटर कॉलनी अंतर्गत रोड
दक्षिणेस : प्लॉट नं. ०२
उत्तरेस :- ९ मीटर कॉलनी अंतर्गत रोड

या वरील चतुःसिमा मधील क्षेत्र ७५.२९ चौ.मी जागा खरेदीदस्ता आधारे नामांतर करणे बाबत कोणाचेही काही उजर / आक्षेप/तक्रार असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन या कार्यालयात १५ दिवसाच्या आत लेखी कागदपत्राच्या पुराव्या सह आक्षेप अर्ज दाखल करावा. नसता नियमाने मुदत संपल्यावर नामांतर साठी कोणाचेही काहीही म्हणने नाही. असे समजुन नामांतर कार्यवाही पुर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

करीता जाहीर प्रगटन माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्याने दिले आहे.

स्वाक्षरित
**मुख्याधिकारी**
**नगरपंचायत घनसांवगी**

**जाहिर प्रगटन**
**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**दुरध्वनी क्रमांक : ०२-४८३-२७५०२६**
**जा..क्र.२०२५/ सेतु/कावि-८१२**
**दिनांक - ०७/१०/२०२५**

तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय
अर्जदार श्रीमान/श्रीमती रामा लक्ष्मण गायकवाड रा. अंबड ता. अंबड जि. जालना यांनी यांच्या नातू जन्म /मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | स्वराज सुनिल लोखंडे | नातू | ०५/०४/२०२४ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

स्वाक्षरित
**तहसिलदार तथा कार्यकारी**
**दंडाधिकारी, अंबड**

## ९ महिन्यांत तिकीट तपासणीतून ११ कोटींची वसुली

छत्रपती संभाजीनगर

दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागाने तिकीट तपासणी मोहिमेत विशेष कामगिरी केली असून, मागील ९ महिन्यांत तब्बल ११ कोटी ६ लाखांची विक्रमी महसुलाची वसुली केली आहे. निर्धारित उद्दिष्ट ओलांडणारा नांदेड विभाग हा एकमेव ठरला आहे.

रेल्वेच्या नांदेड विभागाने एप्रिल ते डिसेंबर-२०२५ या ९ महिन्यांच्या कालावधीत तिकीट तपासणी मोहीम राबवली. या मोहिमेत तब्बल ११.६ कोटींचा महसूल मिळवला. ही कामगिरी मागील वर्षाच्या याच कालावधीच्या तुलनेत २०.२३ टक्क्यांनी अधिक असून, निर्धारित उद्दिष्ट ओलांडणारा नांदेड विभाग हा एकमेव विभाग ठरला आहे. तिकीटविरहित प्रवास रोखण्यासाठी एकाच विभागात संपूर्ण स्थानके व गाड्यांचा समावेश असलेल्या ११४ फोर्टेस चेक मोहिमा राबविण्यात आल्या. याशिवाय, मोठ्या पथकांच्या सहभागातून १७ मॅसिव्ह चेक मोहिमा घेण्यात आल्या. या पथकाने संवेदनशील ठिकाणी अचानक तपासणीसाठी ११ स्पॉट चेक पथके नेमण्यात आली होती. तसेच अनधिकृत प्रवास रोखण्यासाठी दरमहा एक तपासणी असा कार्यक्रम राबवण्यात आला. विशेष म्हणजे १७ ऑक्टोबर-२०२५ रोजी एका दिवसात सर्वाधिक कामगिरी नोंदविण्यात आली असून, या दिवशी १,५८१ प्रकरणे उघडकीस आणत १०,९०,१३९ इतकी रक्कम वसूल करण्यात आली. तसेच ऑक्टोबरच्या पूर्ण महिन्यात २६, २६६ प्रकरणे नोंदवून १ कोटी ५५ लाख २१ हजार ८३५ इतकी विक्रमी वसुली करण्यात आली. या कारवायांसाठी ३३ तिकीट तपासणी पथक कर्मचारी, १७विभागीय कार्यालयातील कर्मचारी व १७१ यात्री सुविधा कर्मचारी आदींचा समावेश होता.

ही मोहीम विभागीय रेल्वे व्यवस्थापक प्रदीप कामले, डॉ. विजय कृष्णा, बी. रितेश आणि शैलेश कुमार सिंह यांच्या नेतृत्वाखाली राबविण्यात आली.

# दहा तासांत खुनाचा उलगडा

## स्थानिक गुन्हे शाखेची कामगिरी,आरोपी अटकेत

बीड । प्रतिनिधी

शिरूर कासार तालुक्यातील रायमोहा येथे घडलेल्या तरुणाच्या निर्घृण खून प्रकरणाचा उलगडा स्थानिक गुन्हे शाखेने अवघ्या दहा तासांच्या आत करून आरोपीला अटक केली आहे. चांद अल्हाहुद्दीन तांबोळी (वय ३०, रा. रायमोहा) असे मृत व्यक्तीचे नाव असून तो व्यवसायाने पेंटर होता. रविवारी (दि. १ फेब्रुवारी) सकाळी तो बीडला जातो असे सांगून स्वतःच्या मोटारसायकलवरून घरातून निघाला होता. मात्र तो रात्रीपर्यंत परत न आल्याने कुटुंबीयांनी हरवल्याची तक्रार दाखल केली होती.

सोमवारी सकाळी रायमोहा परिसरात त्याचा मृतदेह आढळून आला. डोक्यावर दगडाने मारहाण केल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले असून त्यातच त्याचा मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाले. या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली होती.

घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन बीड स्थानिक गुन्हे शाखेने तात्काळ तपासाची सूत्रे हाती घेतली. तांत्रिक माहिती व गुप्त खबर यांच्या आधारे संशयित आरोपीला बीड शहरातून ताब्यात घेण्यात आले.

या खुणातील आरोपी; अतिक गुलाब तांबोळी वय -२९ रा. इस्लामपुरा बीड असे असून पैशांच्या व्यवहारातून हा वाद निर्माण होऊन खून केल्याची माहितीने आरोपीने दिली. अटक करण्यात आलेल्या आरोपीला पुढील तपासासाठी शिरूर पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले आहे. अवघ्या बारा तासांत खून प्रकरणाचा छडा लावल्याने स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाचे सर्वत्र कौतुक होत आहे. ही कारवाई बीड पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, पोलीस उपाधीक्षक पूजा पवार, ठाणे गुन्हे शाखा निरीक्षक शिवाजी बंटेवाड,पीएसआय खटावकर पीएसआय सुतुळे, अशोक दुबाले,राहुल शिंदे,सोमनाथ गायकवाड,मारुती कांबळे,बाळू सानप,अश्फाक सय्यद,मनोज परजने,अतुल हराळे, अलीम शेख, विकी सुरवसे व स्थानिक गुन्हे शाखेची टीम यांनी अवघ्या दहा तासात गुन्हा उघडकीस आणत या प्रकरणाचा पर्दाफाश केला.




## श्री क्षेत्र मच्छिंद्रनाथ गड मंदिर जीर्णोद्धारासाठी ३ कोटी रुपयांची देणगी जाहीर

आष्टी । प्रतिनिधी

तालुक्यातील सावरगाव (मायंबा) येथील ग्रामस्थांनी पवित्र श्री क्षेत्र मच्छिंद्रनाथ गडावरील श्री मच्छिंद्रनाथ मंदिराच्या भव्य व दिव्य जीर्णोद्धारासाठी तब्बल ३ कोटी रुपयांची देणगी देण्याची ऐतिहासिक घोषणा केली आहे.

नाथ भक्त लोकनेते आमदार सुरेश आण्णा धस यांनी ''आपल्या ग्रामदेवतेच्या मंदिर जीर्णोद्धारासाठी पहिली देणगी आपणच द्यावी'' असे आवाहन ग्रामस्थांना केले होते. या आवाहनाला प्रतिसाद देत सावरगाव (मायंबा) येथे आयोजित बैठकीत ग्रामस्थांनी एकमुखाने मंदिर जीर्णोद्धारासाठी निधी संकलनाचे उद्दिष्ट ठरवले. ग्रामस्थांनी आपल्या परीने एक लाख, दोन लाख रुपयांचे योगदान देत आजपर्यंत १ कोटी २७ लाख रुपयांची रक्कम जमा केली असून उर्वरित निधीही लवकरच जमा केला जाणार असल्याचा विश्वास ग्रामस्थांनी व्यक्त केला आहे.

सद्गुरु मच्छिंद्रनाथ महाराज की जय!
अवधूत चिंतन श्री गुरुदेव दत्त!

# आपल्या मुलांना चांगले संस्कार द्या चांगली पिढी घडेल - साध्वी अंजनाताई कोठुळे

बीड । प्रतिनिधी

मुलांना चांगले संस्कार द्या पिढी चांगली घडेल. भागवत कथा, कीर्तन श्रवणाच्या संस्काराने चांगला माणूस घडतो.असे प्रतिपादन श्री ह भ प भागवताचार्य साध्वी अंजनाताई कोठुळे यांनी केले. बीड तालुक्यातील आहेर धानोरा गावात श्रीमद् भागवत कथेत त्या बोलत होत्या.यावेळी मोठ्या संख्येने भाविक भक्तांची उपस्थिती होती.




बीड तालुक्यातील आहेर धानोरा गावात श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळा सुरू आहे. साध्वी श्री ह भ प अंजनाताई कोठुळे यांच्या वाणीतून कथा श्रवण करून श्रोते मंत्रमुग्ध होत आहेत. दुसऱ्या दिवसाची कथा सांगताना कथा व्यास अंजनाताई यांनी राजा परीक्षित याची कथा सांगितली. पांडवाच्या वंशातील राजा परीक्षित याने फक्त जरासंघाचा मुकुट डोक्यावर घातल्याने विचार बदलले. आणि त्याच्या हातून ऋषींचा अपराध घडला. त्यामुळे शृंगी ऋषींनी शाप दिला सात दिवसात तक्षक सापाच्या दंशाने मृत्यू येईल. मात्र सात दिवसात श्रीमद् भागवत कथा श्रवण केल्याने राजा परीक्षितीचा उद्धार झाला. परीक्षेतील राजाने कलीला राहण्याच्या जागा सांगितल्या त्यामध्ये धूतखेळ,हिंसा,दारू, व्याभिचार, या ठिकाणी राहायला जागा दिली. त्यामुळे दारू व्यसन कुठलेही करू नका आपल्या मुलांना चांगले संस्कार द्या भागवत कथा कीर्तन श्रवण यातून चांगली पिढी निर्माण होऊ शकते. आज मुलावरती ◀◀ पान ३ वर

# धारूर घाटात पुन्हा भीषण अपघात

## भरधाव ट्रकची दुचाकीला समोरासमोर धडक; दोघे गंभीर जखमी

धारूर । प्रतिनिधी

दि. ०३ (मंगळवार) रोजी दुपारी धारूर घाटात भरधाव ट्रकने दुचाकीला समोरासमोर धडक दिल्याने मोठा अपघात झाला. या अपघातात दुचाकी चालकाच्या डाव्या पायाला, तर पाठीमागे बसलेल्या वडीलाच्या डाव्या हाताला गंभीर दुखापत झाली आहे.

धारूर घाटातील वाढते अपघात ही चिंतेची बाब ठरत असून, या मार्गाने प्रवास करणाऱ्या वाहनचालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. घाटाच्या रुंदीकरणाचा प्रश्न अद्याप प्रलंबित असल्याने अपघातांचे प्रमाण लक्षणीयरीत्या वाढले आहे. आठवड्यातून किमान एक अपघात घाट परिसरात होत असल्याचे चित्र असून, यामुळे अनेक नागरिकांना आपला जीव गमवावा लागला आहे, तर अनेकांना कायमचे अपंगत्व आले आहे.

मंगळवारी दुपारी ३ ते ४ वाजण्याच्या सुमारास लातूरकडून जालण्याकडे रेल्वेचे भंगार घेऊन जाणारा ट्रक (क्र. एमएच १८ बीजी ३२८८) धारूर घाटात ब्रेक फेल झाल्याने अनियंत्रित झाला. याच वेळी माजलगावकडून केजकडे जात असलेल्या दुचाकीला (क्र. एमएच ४४ एन ८१७९) ट्रकने समोरासमोर जोरदार धडक दिली. या अपघातात दुचाकीवरील जनार्दन रावसाहेब चौरे (वय ४०) व रावसाहेब चौरे (वय ७५) हे दोघे गंभीर जखमी झाले.घटनास्थळी उपस्थित असलेल्या जागृत नागरिकांनी तात्काळ म्बुलन्सच्या सहाय्याने जखमींना धारूर ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. तेथे प्रथमोपचारानंतर दुखापती गंभीर असल्याने पुढील उपचारासाठी आंबेजोगाई येथील स्वाराती रुग्णालयात हलविण्यात आले.

सध्या या मार्गावर मोठ्या प्रमाणावर ऊस वाहतूक सुरू असल्याने घाटात वारंवार वाहतूक कोंडी होत आहे. अशा परिस्थितीत अपघातांचे प्रमाण आणखी वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात असून, धारूर घाटाचे रुंदीकरण तातडीने करण्यात यावे, अशी मागणी वाहनचालक व नागरिकांकडून होत आहे

# राज्यस्तरीय सामान्य ज्ञान परीक्षेत व्यवस्थेचा फज्जा

## विद्यार्थ्यांना वरांड्यात जमिनीवर बसून परीक्षा देण्याची वेळ -पालकांचा संताप

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा येथे रविवारी दि. ०१ फेब्रुवारी २०२६ रोजी घेण्यात आलेल्या मंथन राज्यस्तरीय सामान्य ज्ञान परीक्षेदरम्यान आयोजकांच्या नियोजनातील गंभीर त्रुटी उघडकीस आल्या. परीक्षा केंद्र म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या प्रियदर्शनी कन्या प्रशाला, पाटोदा येथे विद्यार्थ्यांना बसण्यासाठी पुरेशी व्यवस्था नसल्याने ◀◀ पान ३ वर



## जिल्ह्याचा कायापालट करण्याचे दादांचे स्वप्न सुनेत्रा वहिनी पूर्ण करतील-आ.प्रकाश सोळंके

**माजलगाव । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री दिवंगत अजित दादा पवार यांच्या दि २८ जानेवारी रोजी झालेल्या अपघाती निधनानंतर बीड जिल्ह्याचे पालकमंत्रीपद रिक्त झाले होते.बीड जिल्ह्याचा सर्वांगीण कायापालट करण्याचे स्वप्न दिवंगत उपमुख्यमंत्री अजित दादांनी उराशी बाळगले होते.हे स्वप्न राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार ( वहिनी ) नक्कीच पूर्ण करतील,या दृढ विश्वासातून त्यांचीच बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री म्हणून नियुक्ती व्हावी, अशी आग्रही मागणी करण्यात आली होती.त्याप्रमाणे दि ०२ फेब्रुवारी मंगळवार रोजी राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा वहिनी यांची बीड जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदी नियुक्ती झाल्याने, निश्चितच बीड जिल्ह्याच्या विकासासाठी दिवंगत अजित दादांनी पाहिलेले स्वप्न प्रत्यक्षात उतरणार आहे, असा विश्वास आ.प्रकाश सोळंके यांनी बोलताना व्यक्त केला.



## दहावीच्या विद्यार्थ्यांना सवलतीच्या कलागुणांच्या प्रस्तावांसाठी १८ फेब्रुवारी पर्यंत मुदतवाढ

बीड । प्रतिनिधी

राज्यातील शालांत प्रमाणपत्र फेब्रुवारी-मार्च २०२६ परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांना कलागुणांसाठी दिल्या जाणाऱ्या सवलतीच्या गुणांच्या प्रस्तावांसाठी यंदा विशेष बाब म्हणून मुदतवाढ देण्याचा निर्णय महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने घेतला होता. त्यानुसार शाळांना ३१ जानेवारी २०२६ पर्यंत कलागुणांचे प्रस्ताव विभागीय मंडळाकडे सादर करण्याची मुदतवाढ देण्यात आली होती. परंतु शासकीय रेखाकला परीक्षेचा (एलिमेंटरी आणि इंटरमिजिएट ग्रेड)निकाल नुकताच जानेवारीच्या शेवटच्या आठवड्यात जाहीर झाल्यामुळे राज्य मंडळाचे सचिव दीपक माळी यांनी याबाबत परिपत्रकाद्वारे प्रस्ताव शाळेने संबंधित विभागीय मंडळाकडे दि. १८ फेब्रुवारी २०२६ पर्यंत सादर करण्यास मुदत वाढ दिली आहे.

त्याबाबत राज्यातील सर्व विभागीय मंडळांना सूचना दिल्या आहेत. शास्त्रीय कला, चित्रकला क्षेत्रात प्राविण्य मिळवणाऱ्या, लोककला प्रकारांमध्ये सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना सवलतीचे अतिरिक्त गुण देण्यात येतात. या कलागुणांसाठीचे प्रस्ताव शाळेने संबंधित विभागीय मंडळाकडे दि.१८ फेब्रुवारी २०२६ पर्यंत पाठवण्याचे आदेश दिले आहेत. शास्त्रीय कला, चित्रकला आणि लोककलांसाठीचे प्रस्ताव इच्छुक विद्यार्थ्यांनी संबंधित शाळेकडे वेळेत सादर करण्याचे आवाहन शिक्षण व करियर कौन्सिलर डॉ. संजय तांदळे यांनी केले आहे.

# गटसचिव श्रीधरराव अंडील यांचा सेवापुर्ती सन्मान सोहळा

वडवणी । प्रतिनिधी

धारूर तालुक्यातील सेवा सहकारी संस्था मर्यादित तांदळवाडी व धुनकवड या संस्थेचे जेष्ठ सचिव माननीय श्री.श्रीधरराव ज्ञानोबा अंडील हे नियत वयोमानानुसार शनिवार दि.३१/०१/२०२६ रोजी सेवानिवृत्त झाले आहेत त्यांचा सेवापुर्ती गौरव सोहळा धारूर या ठिकाणी संपन्न झाला.



धारूर तालुका गटसचिव संघटना व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक शाखा धारूर यांच्या वतीने त्यांचा सोमवार दि.०२/०२/२०२६ रोजी धारूर या ठिकाणी सन्मान करण्यात आला ते डीसेंबर १९९५ रोजी सेवा सहकारी सोसायटी या संस्थेत गट सचिव या पदावर सेवेत रुजु झाले.बीड जिल्हा देखरेख सहकारी संस्थेच्या आदेशानुसार गट सचिव या पदावर त्यांची नियुक्ती झाली व त्यांनी प्रदीर्घ अशी ३० वर्षाची सेवा सहकार क्षेत्रामध्ये यशस्वीरित्या पूर्ण केली अतिशय मितभाषी,सर्वांचा आदर करणारे व्यक्तिमत्व म्हणून त्यांच्याकडे पाहिलं जातं. कोणालाही कोणतीही अडचण असली तर ती अडचण सोडवण्यासाठी ते प्रयत्नशील असायचे सर्व सचिवाला बरोबर घेऊन जाण्यासाठी त्यांचा प्रयत्न सदैव असायचा त्यांचं वागणं म्हणजे इतरांना आदर्श घेण्यासारखं व्यक्तिमत्व असुन,त्यांच्या संस्थेचं रेकॉर्ड अतिशय अद्यावत ठेवण्यामध्ये त्यांनी कधीही निष्काळजीपणा केला नाही तसेच त्यांनी काही काळ धारूर तालुका देखरेख सहकारी संस्थेमध्ये सहाय्यक सचिव म्हणूनही काम केले त्या ठिकाणी सुद्धा त्यांनी सचिवांवर अतिशय प्रेम करून चांगले काम करून घेतले आणि तालुका नेहमी कामांमध्ये अग्रेसर कसा राहील हे पाहिलं. त्यांच्या संस्थेवर त्यांची प्रतिमा अतिशय सुंदर अशा प्रकारची राहिली आज त्यांच्या सेवानिवृत्तीच्या निमित्ताने दि. बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक शाखा धारूर या ठिकाणी यथोचित सन्मान करण्यात आला.

याप्रसंगी कातळे साहेब साह्यक निबंधक,एम आर गव्हाणे शाखाधिकारी,रमेशराव साखरे चेअरमन तांदळवाडी,लक्ष्मणराव काळे चेअरमन धुनकवाड,शाहुराव साखरे, ◀◀ पान ३ वर

# नागझरीच्या कन्येचा दिल्लीत 'होम रन'

## राष्ट्रीय बेसबॉल स्पर्धेत महाराष्ट्राला कांस्यपदक!

केज । प्रतिनिधी

दिल्ली येथे नुकत्याच संपन्न झालेल्या 'राष्ट्रीय बेसबॉल (१९ वर्षांखालील मुली) स्पर्धेत' महाराष्ट्र संघाने आपल्या अष्टपैलू खेळाचे प्रदर्शन करत कांस्यपदक (ईीपश चशवरश्र) पटकावले आहे. या विजयामुळे संपूर्ण महाराष्ट्राच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून, बीड जिल्ह्याच्या शिरपेचातही मानाचे पान जोडले गेले आहे.

नागझरीच्या कन्येची दैदीप्यमान कामगिरी या विजयी संघात केज तालुक्यातील नागझरी गावची सुकन्या कु. प्रांजली चंद्रसेन मुद्रिका चौरे हिने आपल्या उत्कृष्ट खेळाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. प्रांजली ही नागझरी गावच्या सरपंच सौ. मुद्रिका चंद्रसेन चौरे यांची कन्या आहे. ग्रामीण भागातील एका खेळाडूने राष्ट्रीय स्तरावर मजल मारून पदक प्राप्त केल्यामुळे परिसरात आनंदाचे वातावरण आहे.




स्पर्धेचा थरार देशभरातील विविध राज्यांच्या तगड्या संघांना पराभूत करत महाराष्ट्र संघाने उपांत्य फेरीपर्यंत धडक मारली होती. अत्यंत चुरशीच्या झालेल्या सामन्यांमध्ये प्रांजलीने बेसबॉल मधील दोन्ही आघाड्यांवर चमकदार कामगिरी केली. तिच्या या यशात तिचे प्रशिक्षक, आई-वडील आणि संघ सहकाऱ्यांचे मोलाचे ◀◀ पान ३ वर

# नामस्मरणाने जीवनाचे कल्याण होते -नवनाथ महाराज

बीड । प्रतिनिधी

मनुष्य आयुष्यभर पोटासाठी, लेकरा बाळासाठी खटाटोप करत असतो, हा संसाराचा गाडा ओढत असताना नकळत पाप मनुष्यांच्या हातून होते हे पाप कमी करण्यासाठी संसारी जीवाने नामस्मरण करावे नामस्मरणाने जीवनाचे कल्याण होते असे संत श्रेष्ठ जगदुरू तुकाराम महाराजांचा

नाम घेता वाया गेला । ऐसा कोणे आईकीला ।।
सांगा विनवितो तुम्हांसी । संत महंत सिद्ध ऋषी ।।
नामें तरला नाही कोण । ऐसा द्यावा निवडून ।।
सलगीच्या उत्तरा । तुका म्हणे क्षमा करा ।।




या अभंगाचे विवेचन करताना गुरुवर्य शांतीब्रम्ह नवनाथ बाबा महाराज यांनी संसारी जीवांना उपदेश करताना भावार्थ सांगितला गंगनाथवाडी येथे अखंड हरिनाम सप्ताह मध्ये प्रथम किर्तन रुपी सेवा अर्पण करताना गुरुवर्य शांती ब्रह्मा नवनाथ बाबा महाराज यांनी अभंग विवेचनात पुढे असे म्हटले की साधुसंतांनी भक्तीचा पाया रचला या संसारी जीवनामध्ये अडकलेल्या माणसाला मोहमाया रुपी संसारातून परमात्म्याकडे घेऊन जाण्याचा मार्ग दाखवण्याकरिता नामस्मरण हे अतिशय महत्त्वाचे आहे नामस्मरणाचा महिमा सांगताना नामस्मरणाने वाल्याचा वाल्मिकी होतो; जगामध्ये असा कोण आहे की तो नामस्मरणामुळे वाया गेला आहे? असा जगात कोणीही नाही; नामस्मरणाने संसारी जीवाचे कल्याणच होते .

जन्माला आलेल्या प्रत्येक जीवाला मृत्यू आटळ आहे जन्ममृत्यूच्या फेऱ्यांमधून सुटण्याकरिता नामस्मरण करावे असा नामस्मरणाचा महिमा गुरुवर्य शांतीब्रह्म बाबा महाराज यांच्या ◀◀ पान ३ वर

# भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने माघ पौर्णिमा उत्साहात साजरी

माजलगाव । प्रतिनिधी

बौद्ध धम्मात पौर्णिमांना अत्यंत महत्वाचे स्थान आहे. तथागतांच्या जीवनातील महत्वाच्या घटणा प्रत्येक पौर्णीमांचे महत्व सांगतात माघ पौर्णिमेस बौद्ध धम्मात अत्यंत महात्वाचे स्थान आहे तथागतांनी निर्वाणाची घोषणा केली होते.तथागत भगवान गौतम बुद्ध जगातील एकमेव व्यक्ति आहेत की वैशाख पौर्णीमेला माझे निर्वाण होईल आशी स्वताच निर्वानाची घोषना त्यांनी केली या घटनांचे स्मरण म्हणून आजची माघ पौर्णिमा भारतीय बौद्ध महासभेच्या वतीन सांची बुद्ध विहार



डॉ.आंबेडकर भवन केसापुरी वसाहत येथे मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या सुरुवातीस तथागत बुद्ध व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पुजन करण्यात आले सामुहिक वंदना घेऊन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली याप्रसंगी भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हा संस्कार उपाध्यक्ष आद.एस बी मोरे, महिला जिल्हा संस्कार सचिवा केंद्रीय शिक्षिका ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार
पुणे विशेष
बुधवार दि.४ फेब्रुवारी २०२६ । पान ७

# संचेती चौकातील कोंडी फुटणार; महापालिकेचा मास्टर प्लॅन तयार; 'हा' नवा पूल बदलणार चित्र



**पुणे । प्रतिनिधी**

**महापालिकेकडून गणेशखिंड रस्त्यावरील वाहतूक कोंडी फोडण्यासाठी या रस्त्यावर पुणे विद्यापीठ चौकात बहुमजली उड्डाणपूल उभारण्याचे काम सुरू आहे. त्यासाठी हा रस्ता ४५ मीटर रुंद करण्यात आला असला, तरी शिमला ऑफिस चौक आणि संचेती हॉस्पिटल चौकात मेट्रोचे स्थानक तसेच मेट्रोचे खांब रस्त्यातच असल्याने या दोन्ही चौकांत वाहतुकीची 'बॉटलनेक' स्थिती निर्माण झाली आहे.**

त्यातच, विद्यापीठ चौकातील पुलाचे काम पूर्ण झाल्यानंतर या कोंडीत भर पडणार आहे.त्यामुळे महापालिकेकडून विद्यापीठ रस्त्याने आलेली वाहने कृषी महाविद्यालय चौकातून डावीकडे वळून जुना पुणे-मुंबई महामार्ग तसेच संगमवाडीकडे जाण्यासाठी नवीन वाय-आकाराचा उड्डाणपूल उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

साखर संकुलपासून पुढे न. ता. वाडीच्या भुयारी मार्गावरून हा पूल जाणार आहे. या पुलासाठी सुमारे ७५ कोटींचा खर्च अपेक्षित असून महापालिकेच्या अंदाज समितीमध्ये या पुलास मान्यताही देण्यात आली आहे.या पुलामुळे शिमला ऑफिस चौक आणि संचेती हॉस्पिटल चौकातील कोंडी सुटण्यास मदत होणार आहे. प्रशासनाकडून त्यासाठी लवकरच निविदा प्रक्रिया राबविण्यात येणार असल्याची माहिती प्रकल्प विभागाकडून देण्यात आली.

मेट्रोने वाढविली कोंडी

कृषी महाविद्यालय ते संचेती हॉस्पिटलपर्यंत आधीच असलेला उड्डाणपूल आणि त्यानंतर मेट्रो प्रकल्पामुळे वाहतूक कोंडी वाढली आहे. फर्गसन रस्त्याने तसेच बाजीराव रस्त्याने शिमला ऑफिसकडे येणारी वाहने जुना पुणे-मुंबई महामार्ग तसेच पुणे स्टेशनकडे जाण्यासाठी या दोन्ही चौकांत येतात. या रस्त्यावर आधीच राहुल सिनेमासमोर उड्डाणपूल आहे.त्यानंतर लगेच आकाशवाणीसमोर मेट्रो मार्ग क्रमांक ३ चे स्थानक आहे. पुढे रस्त्याच्या मधोमध संचेती हॉस्पिटलकडे जाणाऱ्या रस्त्यावर मेट्रोचे खांब आहेत. परिणामी, या रस्त्याची वहन क्षमता कमी झाली आहे. त्यामुळे या दोन्ही चौकांत दिवसभर कोंडी असते.साखर संकुलकडून जुना पुणे-मुंबई महामार्गाकडे जायचे असल्यास या भुयारी मार्गातून केवळ दुचाकी वाहने जात असल्याने चारचाकी वाहनांना संचेती चौकातूनच जावे लागते.त्यामुळे महापालिकेने या भुयारी मार्गाच्या वरील बाजूस उड्डाणपूल उभारण्याचा निर्णय घेतला असून तो वाय-आकाराचा असेल. हा पूल साखर संकुलसमोरून थेट जुना पुणे-मुंबई महामार्ग तसेच संगमवाडीकडे जाण्यासाठी स्वतंत्र लेनचा असेल. तर भुयारी मार्ग केवळ शहरात येण्यासाठी राखीव ठेवण्यात येणार आहे.

# गिर्यारोहणासाठी आली अन् बेपत्ता झाली; मुंबईतील 'श्रुती'चा लोणावळ्यात दुर्दैवी अंत

लोणावळा । प्रतिनिधी

लोणावळ्यात गिर्यारोहणासाठी आलेल्या नवी मुंबईतील तरुणीचा मृतदेह टायगर पॉईंट परिसरातील दरीत सापडला. या प्रकरणी अकस्मात मृत्यू अशी नोंद करण्यात आली आहे.ग्रामीण पोलिसांकडून या प्रकरणाचा तपास करण्यात येत आहे.



श्रुती पती ( २०, रा. बेलापूर, नवी मुंबई) असे मृतावस्थेत सापडलेल्या तरुणीचे नाव आहे. लोणावळा परिसरातील नागफणी (ड्युक्स नोज) परिसरात श्रुती शनिवारी (३१ जानेवारी) गिर्यारोहणासाठी आली होती. श्रुती बेपत्ता झाल्यानंतर तिच्या कुटुंबीयांनी पोलिसांकडे तक्रार दिली. त्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी भेट दिली. पोलिसांनी या भागातील ग्रामस्थांकडे चौकशी केली. त्यानंतर पोलिसांनी शिवदुर्ग मित्र गिर्यारोहक संस्थेतील सदस्य सुनील गायकवाड, वैष्णवी भांगरे, महेश मसने यांच्यासह सहकाऱ्यांची मदत घेतली.

घटनास्थळी श्वानपथकाला पाचारण करण्यात आले. पोलिसांना एक पर्स सापडली. त्यानंतर गिर्यारोहक योगेश उंबरे आणि सहकारी खोल दरीत दोराचा वापर करुन खाली उतरले. त्यानंतर पोलिसांनी ड्रोन कॅमेरे मागविले.

अंधारात अत्याधुनिक ड्रोन कॅमेऱ्याचा वापर करुन शोध घेण्यात आला. गिर्यारोहक चारशे फूट खोल दरीत उतरल्यानंतर एका भागात श्रेयाचा मृतदेह सापडला. रात्री पावणेदहाच्या सुमारास तिचा मृतदेह बाहेर काढण्यात आला.

पोलीस अधीक्षक संदीपसिंग गिल, उपविभागीय अधिकारी गजानन टोम्पे यांनी घटनास्थळी भेट दिली.लोणावळा ग्रामीणचे पोलीस निरीक्षक दिनेश तायडे, लोणावळा शहर पोलीस ठाण्याचे निरीक्षक राजेश रामाघरे, सहायक निरीक्षक राहुल लाड आणि पथकाने शोधमोहिम राबविली. 'श्रुती दरीत कशी पडली, यादृष्टीने तपास करण्यात येत आहे. या प्रकरणी लोणावळा पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यू अशी नोंद करण्यात आली आहे. श्रुती विधी अभ्यासक्रम करत होती', अशी माहिती पोलीस निरीक्षक दिनेश तायडे यांनी दिली.

# समाजाकडे विश्वासाने पाहण्याची गरज; समर्थ भारत ही संधी व आव्हान- डॉ. मोहन भागवत



पुणे । प्रतिनिधी

समाज संघाकडे सकारात्मकतेने, विश्वासाने बघतो. ही आपल्यासाठी संधी आणि आव्हान दोन्ही आहे. समर्थ भारतसारखी नियोजनबद्ध कामे पूर्व योजनेने हाती घेणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी केले. मोतीबाग येथे सरसंघचालकांच्या हस्ते समर्थ भारतच्या अद्ययावत संकेतस्थळाचे उद्घाटन झाले. त्यावेळी ते बोलत होते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पुणे महानगर संघचालक रवींद्र वंजारवाडकर या वेळी उपस्थित होते. भागवत पुढे म्हणाले की, संघात काम करताना नागरिकांना सुरक्षितता वाटते असा अनुभव आहे. काळाची शर्यत लक्षात घेता समाजाची कामे गतीने झाली पाहिजेत. त्यासाठी तंत्रज्ञानाचा उपयोग करून घेत स्थानिक पातळीवरील समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न करायला हवेत. त्यासाठी ही वेबसाईट नक्कीच उपयोगी आहे.

समर्थ भारत हा एक सामाजिक उपक्रम असून, सामाजिक कामांमध्ये नागरिकांच्या सक्रिय सहभागातून भारताला सक्षम बनवण्याच्या उद्देशाने कार्यरत आहे. आरोग्यसेवा, शिक्षण, सक्षमीकरण, शाश्वतता आणि समुदाय विकास अशा विविध सामाजिक उपक्रमांशी सामान्य नागरिक, स्वयंसेवक, स्वयंसेवी संस्था आणि कॉर्पोरेट्स यांना जोडणे हे समर्थ भारतचे प्रमुख कार्य आहे.

२०१७ मध्ये सुरू झालेला समर्थ भारत हा एक मोफत प्लॅटफॉर्म असून, नागरिक, स्वयंसेवी संस्था आणि कॉर्पोरेट्स यांच्यातील दरी भरून काढण्यासाठी तयार करण्यात आला आहे. नागरिकांना अर्थपूर्ण सामाजिक उपक्रमांशी जोडून, स्वयंसेवी संस्था, स्वयंसेवकांचे नेटवर्क आणि सीएसआर साठी कटिबद्ध कंपन्या यांना एकत्र आणण्याचे कार्य समर्थ भारत करते. आजपर्यंत समर्थ भारतने ७ हजार ५०० हून अधिक स्वयंसेवकांना विविध स्वयंसेवी संस्थांशी जोडले आहे.

२०१८ मधील स्वच्छ नदी अभियान, कोविड-१९ मदतकार्य, ३ लाखांहून अधिक रक्तपिशव्यांचे संकलन, ५१ लाखांपेक्षा जास्त भोजन वितरण आणि एक लाखांहून अधिक वैद्यकीय तपासण्या अशा अनेक प्रभावी सामाजिक उपक्रमांना चालना दिली आहे. सेवा भारती, ग्राम विकास, पूर्णम इकोव्हिजन, स्वरुपवर्धिनी, जनकल्याण ब्लड सेंटर, सेवा आरोग्य, स्वानंद जनकल्याण, एक क्षण आनंदाचा तसेच इतर अनेक संस्थांना पाठबळ दिले आहे. सहकार्याच्या माध्यमातून समुदायांना सक्षम बनवणे, विविध कॉर्पोरेट्सना कोणत्याही खर्चाशिवाय स्वयंसेवी संस्थांशी जोडून यामुळे सीएसआर गुंतवणूक थेट समाजाच्या गरजांपर्यंत पोहोचविण्यासाठी समर्थ भारत काम करते. या वेळी समर्थ भारतचे मंगेश घाटपांडे, विनोद खरे, अधिराज गाडगीळ उपस्थित होते.

# सावधान! आता बालमजुरी महागात पडणार; मालकांविरुद्ध थेट फौजदारी गुन्हा आणि मोठा दंड

पुणे । प्रतिनिधी

बालमजुरी ही अनिष्ट प्रथा कायमस्वरुपी दूर करून बालमजुरांना शिक्षणाच्या मूळ प्रवाहात समाविष्ट करून त्यांचे आवश्यकतेनुसार पुनर्वसन करण्यात येणार आहे. यासाठी जिल्हास्तरीय बालकामगार कृती समितीची स्थापना करण्यात आली असून, त्यांची कार्यपद्धतीही ठरविण्यात आलेली आहे.



विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी व तहसीलदार यांचे स्तरावर कार्यपद्धती याबाबत अभ्यास करण्यासाठी विषयवार समित्या स्थापन केल्या होत्या. महसूल प्रशासनाच्या अध्यक्षतेखाली गठीत विविध समित्यांचा आढावा घेऊन सुसूत्रीकरण करण्यासाठी शिफारशीही करण्यात आल्या. जिल्हास्तरीय बालकामगार कृती समितीचे कर्तव्य व जबाबदाऱ्याही ठरविण्यात आलेल्या आहेत. जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, महानगरपालिका आयुक्त, नगरपरिषद मुख्याधिकारी, जिल्हा पोलीस अधीक्षक, सहायक पोलिस आयुक्त, निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे प्राथमिक शिक्षणाधिकारी, जिल्हा समाज कल्याण अधिकारी,

जिल्हा आदिवासी विकास विभागाचे अधिकारी, जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, होमगार्डस जिल्हा समादेशक,अशासकीय स्वंयसेवी संस्थाचे दोन प्रतिनिधी आदींचा सदस्य तर सहायक कामगार आयुक्त यांचा सदस्य सचिव म्हणून समितीत समावेश करण्यात आला आहे. बालकामगार आढळून आल्यास कसूरदार मालकांविरुद्ध फौजदारी गुन्हा दाखल करून मालकांकडून प्रत्येक बाल कामगारामागे २० हजार रुपयांची दंड वसुलीची कारवाई केली जाणार आहे. जोखमीच्या व्यवसायातून मुक्त केलेल्या बाल कामगारांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत उपलब्ध करून देण्यात येणार आहे. बालकामगारांचे पालक बालकास मजुरी करण्यास पाठविणार नाहीत, याबाबत दक्षताही बाळगण्यात येणार आहे.बालकांच्या व्यक्तिमत्व विकासाच्या काळात म्हणजेच त्यांना शिक्षणाची संधी मिळणे आवश्यक असताना, काम करण्यास भाग पाडण्याच्या अनिष्ट प्रथेच्या निर्मूलनासाठी व्यापक जनजागृती केली जाणार आहे. बालकास बालमजुरीतून मुक्त केल्यानंतर अशा ठिकाणाजवळ शाळा, अतिरिक्त शिक्षण वर्ग, शैक्षणिक साहित्य या पायाभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. जिल्हाधिकारी कार्यालयात बाल कामगार या विषयासाठी एक स्वतंत्र कक्ष तयार करण्यात यावा, अशा सूचनाही कामगार विभागाकडून देण्यात आलेल्या आहेत.

# राष्ट्रीय ओबीसी फाऊंडेशन महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष पदी डॉ.ज्योती ताई शिरसाट (पुणे)यांची निवड

**पुणे । प्रतिनिधी**

वाघोली येथील सामाजिक कार्यकर्त्या तथा बीड जिल्ह्याची भूमिपुत्री डॉ.ज्योती ताई शिरसाट( पुणे) यांची राष्ट्रीय ओबीसी फाउंडेशनच्या महीला महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष पदी निवड करण्यात आली



राष्ट्रीय ओबीसी फाउंडेशनच्या प्रदेश अध्यक्ष पदाची धुरा त्यांच्याकडे सोपवण्यात येत आहे या निवडीमुळे समाजाच्या सर्व स्तरातून त्यांना शुभेच्छा देण्यात येत आहे..

गेल्या ३०-३५ वर्षांपासून वाघोली आवळवाडी येथे वैद्यकीय सेवांचे माध्यमातून डॉक्टर ज्योती शिरसाट यांनी उल्लेखनीय कामगिरी केली असून समाजसेवेचा छंद जोपासणाऱ्या महिला म्हणून पुणे जिल्ह्यात त्यांना ओळखले जाते. डॉक्टर ज्योती शिरसाट या मूळच्या बीड जिल्ह्यातील शिरूर कासार तालुक्यातील असून ग्रामीण भागाशी त्यांचे अत्यंत जवळचे नाते आहे.. समाजातील प्रत्येक उपेक्षित घटकांना न्याय मिळवून देण्याचे काम त्या गेल्या ३०-३५ वर्षांपासून करत असून त्यांच्या या निवडीमुळे बीड जिल्ह्याच्या शिरपेचात अजून एक मानाचा तुला लागला असून राष्ट्रीय ओबीसी फाऊंडेशन संस्थापक अध्यक्ष उमेश आनेराव राष्ट्रीय अध्यक्ष यांनी त्यांच्या कार्याची दखल घेऊन डॉक्टर ज्योती शिरसाट यांची ओबीसी फेडरेशनच्या प्रदेशाध्यक्षपदी निवड केली आहे.. या निवडीबद्दल मा. आर. के. दिवाकर उपाध्यक्ष भुषण पवार राज्य प्रवक्ते द्वारकादास फटाले यांच्यासह यावेळी संघटनेचे सचिव उमेश आनेराव बार्शी, शंकर वानेगावकर नांदेड,संजय मोगरे नाशिक, महीला अध्यक्ष विजयालक्ष्मी आनेराव,दिपा वैतकार वैशाली ताई परदेशी,मिनल लिंबोळे,विद्या ताई घुगे,विजया माळी, मंगल डफळ,विद्या कातखडे, तर महाराष्ट्रातील सर्व जिल्हा पदाधिकार्यांनी या निवडीबद्ल अभिनंदनांचा वर्षाव केला.

# दारू पिऊन वाहन चालविणाऱ्यांची 'शाळा' पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांचा सज्जड इशारा

पुणे: मद्यप्राशन करून वाहन चालविणाऱ्या तळीरामांची पोलिस आयुक्त आमितेश कुमार यांनी सोमवारी (दि. २) पोलिस मुख्यालयात शाळा घेतली. यावेळी त्यांना खास आपल्या शैलीत सज्जड दम भरून यापुढे मद्यप्राशन करून वाहन न चालविण्याबाबत कडक इशारा देखील दिला. याप्रसंगी मद्यप्राशन करून वाहन चालविल्याप्रकरणी कारवाई करण्यात आलेले एक हजारपेक्षा अधिक वाहनचालक उपस्थित होते. 'रस्ता सुरक्षा अभियान २०२६'अंतर्गत समुपदेशन व मार्गदर्शन शिबिराचे आयोजन केले होते. त्यावेळी अमितेश कुमार बोलत होते. अपर पोलिस आयुक्त मनोज पाटील, पोलिस उपायुक्त हिम्मत जाधव यांच्यासह वाहतूक विभागाचे अधिकारी यावेळी उपस्थित होते.

पोलिस आयुक्त म्हणाले, 'शहरात यापुढे कोणी मद्यप्राशन करून वाहन चालविणार नाही. अशी आमची भूमिका आहे. कारण आम्ही त्यांचा तसा



बंदोबस्तच करू. तुम्ही मद्यप्राशन करून वाहन चालविल्याने अपघात घडतात. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांवर त्याचे परिणाम होतात, याची कल्पना प्रत्येकाला असावी. अशा वाहनचालकांना कायम लक्षात राहील, अशी कारवाई पोलिस करतील. त्यांची वाहने तर जप्त करूच, पण त्यांना त्यांचे मित्र, कुटुंबीय यांच्या देखत त्यांचा सत्कार चौकात करून, पोलिसांच्या संकेतस्थळावरदेखील त्यांचे फोटो आम्ही प्रसिद्ध करू. मागील दोन वर्षांच्या तुलनेत २०२५ मध्ये पोलिसांनी तब्बल सहा हजार वाहनचालकांवर मद्यप्राशन करून (ड्रंक इन ड्राईव्ह) वाहन चालविल्याप्रकरणी कारवाई केली आहे. यापुढील कालवधीतसुद्धा पोलिस टार्गेट ठेवून सर्जिकल स्ट्राईकप्रमाणे ही कारवाई करतील.

मनोज पाटील म्हणाले, शिक्षा देणे हा उद्देश नाही. परंतु तुम्ही वाहतूक नियमांचे पालन नाही केले तर त्याचे परिणाम गंभीर होतात.भारत अपघातात सर्वाधिक पुढे आहे. प्रत्येक वर्षी भारतात १ लाख ८० हजार नागरिकांचा रस्ते अपघातात मृत्यू होतो. म्हणजेच प्रत्येक दिवशी चारशे नागरिक रस्ते अपघातात मृत्यू पावतात, तर सात लाख लोकांना कायमस्वरूपी अपंगत्व येते. याचा विचार आपण सर्वांनी करणे गरजेचे आहे.

प्रत्येक आठवड्याला 'तळीरामांची शाळा'

प्रत्येक आठवड्याला पोलिस मुख्यालयात तळीरामांची शाळा पोलिसांकडून घेण्यात येणार आहे. त्यांना या समुपदेशन शिबिराला हजरच राहावे लागणार आहे. त्याचबरोबर रॅश ड्रायव्हिंग, ट्रिपल सीट दुचाकी चालविणे, विरुद्ध दिशेने वाहन चालविणे अशा वाहनचालकांवर कारवाई करण्यात आल्यानंतर त्यांची वाहने जप्त करण्याच्या सूचना पोलिस आयुक्तांनी दिल्या आहेत.

# अभियांत्रिकी संवर्गात खांदेपालट! महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांचे आदेश

पुणे । प्रतिनिधी

महापालिकेच्या पथ विभागाचे प्रमुख अनिरुद्ध पावसकर यांना शहर अभियंता पदावर बढती देण्यात आली आहे. त्यामुळे पथ विभागाच्या प्रमुखपदी महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता राजेश बनकर यांची नियुक्ती केली आहे. त्यांच्याकडे पथ विभागाचा प्रभारी पदभार देण्यात आला आहे.



त्याचबरोबर बनकर यांच्याकडे वाहतूक नियोजन विभागाचाही प्रभारी पदभार देण्यात आला आहे.महापालिका आयुक्तांनी अभियांत्रिकी संवर्गातील अधीक्षक अभियंता आणि कार्यकारी अभियंता पदावरील अधिकाऱ्यांच्या कामकाज व्यवस्थेत बदल केला असून, त्यानुसार ही नियुक्ती करण्यात आली आहे.कार्यकारी अभियंता रोहिदास गव्हाणे यांच्याकडे यापूर्वी भवन रचना विभागाच्या अधीक्षक अभियंता पदाचा प्रभारी पदभार देण्यात आला होता. मात्र, या व्यवस्थेत बदल करून आता गव्हाणे यांच्याकडे मलनिस्सारण, तसेच देखभाल व दुरुस्ती विभागाचा प्रभारी पदभार देण्यात आला आहे.कार्यकारी अभियंता प्रवीण शेंडे यांच्याकडे बांधकाम विभागातील अधीक्षक अभियंता पदाचा प्रभारी पदभार देण्यात आला आहे. यापूर्वी त्यांच्याकडे दक्षता आणि भवन रचना विभागाची जबाबदारी होती. दरम्यान, कार्यकारी अभियंता बिपीन शिंदे यांच्याकडे असलेली मलनिस्सारण, तसेच देखभाल व दुरुस्ती विभागाची जबाबदारी बदलण्यात आली असून, आता त्यांच्याकडे भवन रचना विभागाच्या अधीक्षक अभियंता पदाचा प्रभारी पदभार सोपविण्यात आला आहे.

# बारामतीत 'कृतीतून श्रद्धांजली': अजित पवार यांच्या स्मृतीप्रित्यर्थ ६२ बाटल्या रक्त संकलित

**पुणे । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते अजित पवार यांच्या निधनानंतर त्यांना आगळ्यावेगळ्या पद्धतीने श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी बारामतीतील तरुण आणि सामाजिक कार्यकर्ते सरसावले आहेत.

केवळ शोक व्यक्त न करता समाजासाठी काहीतरी ठोस कार्य करण्याच्या उद्देशाने 'कृतीतून श्रद्धांजली' हा उपक्रम राबवण्यात आला.या अंतर्गत आयोजित रक्तदान शिबिरात ६२ बाटल्या रक्त संकलित करून बारामतीच्या लाडक्या अजितदादांना आदरांजली वाहण्यात आली.




हा स्तुत्य उपक्रम बारामतीतील गणेश पॅरामेडिकल इन्स्टिट्यूट आणि आय स्टेपअप कोडिंग अकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला होता. विशेष म्हणजे, या दोन्ही संस्थांमधील विद्यार्थ्यांनी अतिशय उत्साहाने यात सहभाग नोंदवला. रक्तदान हेच श्रेष्ठ दान असून याद्वारे गरजूंचे प्राण वाचवणे, हीच खऱ्या अर्थाने अजित पवार यांना दिलेली मोठी श्रद्धांजली ठरेल, अशी भावना विद्यार्थ्यांनी व्यक्त केली.

या शिबिराप्रसंगी विविध राजकीय पक्षांच्या नेत्यांनी उपस्थित राहून या उपक्रमाचे कौतुक केले. यामध्ये ज्येष्ठ नेते व बारामती नगरपालिकेचे माजी नगराध्यक्ष (राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष) कैलास चव्हाण, संघमित्रा काळुराम चौधरी नगरसेविका (बहुजन समाज पार्टी) या मान्यवरांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांच्या सामाजिक जाणीवेचे अभिनंदन केले. यावेळी एकूण ६२ रक्त बाटल्या संकलित करण्यात आल्या. हा उपक्रम बारामती शहरात चर्चेचा आणि कौतुकाचा विषय ठरला आहे.